म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय बा.वा.
दा. क्र. २३२

# कोजी

BVBK-0400232

बा. वि.
बा. क्र. २३२

म. सं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
वा. क्र. ...२३२... दिनांक ......
विषय ..किशोर.. क्र. ..२९९..

BVBK-0400232

# कोजी

सुमति पायगांवकर

म. सं. म. ठाणे, [illegible] शाखा.
[illegible] वाङ्मय विभाग
ग्रा. क्र. 232 दिनांक ....
विषय किशोर क्र. २११

निर्मल प्रकाशन

प्रकाशन : ४

● प्रकाशक :
नरेंद्र अरगडे
निर्मल प्रकाशन
' देणगी '
१२ अमृतेश्वर सहकारी गृहरचना मर्यादित
पुणे ९.

● सर्व हक्क प्रकाशकाधीन

● किंमत चार रुपये

● प्रथमावृत्ती :
जानेवारी १९७९
(आंतरराष्ट्रीय बालक वर्ष)

● मुद्रक :
रा. गो. पाटील
ज्ञानेश्वरी प्रेस
१४५७ शुक्रवार पेठ
पुणे ३०.

---

-: प्राप्तिस्थळ :-

**अरगडे आणि मंडळी**
बुकसेलर्स,
अप्पा बळवंत चौक, पुणे ३०.

卐

**माधव कुलकर्णी**
बद्रिकाश्रम, पहिली खेतवाडी
अलंकार टॉकीजजवळ, मुंबई ४

## : कोजी




एक सुंदरसं बेट होतं. हिरव्या उंच सुरूच्या वनानं नि हिरव्या उंच माडांच्या आगरानं वेढलेलं बेट! बेटाच्या मध्यभागी एक उंच डोंगर होता. माडाच्या आगरात कोळ्यांनी आपले कोळीवाडे ...ले होते.

...ी पा...

कोजाबाय म्हना. चंदरदेवाची ...

हे कोळी लोक एकजात रेखीव बांध्याचे नि रूपवान होते. फुलांचे नि निसर्गाचे फार वेड होते त्यांना.

एका कोळीवाड्यातल्या एका झोपडीत एक कोळी नि त्याची बायको दोघेच राहायचे. त्यांना मूलबाळच नव्हते. तो कोळी सर्व कोळ्यांचा नायक होता. इतर कोळ्यांबरोबर नायक मचवा घेऊन समुद्रात मासे पकडायला जाई. कोळीण घरी एकटीच असे तेव्हा बरेचदा झोपडीबाहेर येऊन ती इतर कोळणींशी गप्पा मारीत बसे. कधी किनाऱ्यावरच्या मऊ रेतीत एकटीच कितीतरी वेळ बसे.

माडांच्या झावळ्यांतून डोकावणाऱ्या सोनेरी चंद्राला ती म्हणे, " चंद्रलोकच्या चंद्रदेवा, तू तर इतका देखणा ! आमचं रूप कुठंच नाही तुझ्यापुढं. तुझ्या सारखीच एक सुंदर मुलगी दे रे मला... मला मूल नाही की बाळ नाही !...बघ किती एकटी एकटी असते मी...."

एकदा कोजागिरी पौर्णिमा होती. रात्री कोळीवाड्यातले सगळे जण एकत्र जमले होते. चांदणे टिपूर होते-लखलखते. सगळे कोळी दूध पोहे खाऊन नाचत, गात सबंध रात्र जागवणार होते. सारा चंद्रलोक तर किती सुंदर दिसत होता !–तेजस्वी, झळझळ चंदेरी !

बारा वाजले. एका वाटीत थोडे दूध पोहे घेऊन कोळीण हळूच उठली. किनाऱ्यावरच्या मऊ रेतीत येऊन उभी राहिली. एकटीच ! दूध पोह्यांची वाटी हाती धरून, चंद्राकडे एकटक पाहत हात जोडून म्हणाली, " चंद्रलोकच्या चंद्रदेवा, हा नैवेद्य घे. तुझ्या सारखी सुंदर, एकच मुलगी दे रे मला...मी खरंच काहीसुद्धा मागणार नाही..,अगदी खरं..." डोळे पाण्याने डबडबले तिचे.

झपझप पावले उचलीत ती पुन्हा आली, आपल्या कोळयांच्या घोळक्यात, पण तिचे मन कशातच रमेना. बरीच रात्र झाल्यावर सगळे घरोघर गेले. कोळीण घरी येऊन अंथरूणावर पडली. अती थकल्याने डोळा लागला किंचित. तो काय नवल? तिला चंद्रदेवाचेच स्वप्न पडत होते. चंद्रदेव स्वप्नात म्हणत होता, "तुझी माझ्या-वर इतकी भक्ती आहे तर, माझ्याच मुलीला पाठवून देतो. तुझ्या घरी चिमुकल्या बाळाच्या रूपात पाठवतो. तिचं नाव चंद्रकन्या ठेव. मात्र एकच अट. ती पंधरा वर्षांची होताच तिला माझ्याकडे परत नेईन. उघड आहे. एकतर ती हळूहळू उपवर होणार नि दुसरं म्हणजे चंद्रगोलावरचे लोक पृथ्विगोलावर कायम कसे ठेवता येतील?...तेव्हा मात्र दुःख करू नकोस...चंद्रकन्येला अडवू नकोस.... पंधरा वर्षं ती तुझ्याजवळ राहील हे का थोडं?..."

चंद्रदेव नाहीसा झाला. स्वप्न संपले. खडबडून उठली कोळीण... आणि आश्चर्य?..तिच्या कुशीत खरोखरीच एक तान्ही मुलगी आढळली तिला!

अप्रतिम सुंदर, तेजस्वी मुलगी!

साऱ्या कोळीवाड्यात बातमी पसरली. कोळीण तर वेडावूनच गेली होती या चमत्कारानं. चिमुकल्या चंद्रकन्येला पाहायला सारा कोळीवाडा लोटला. तिचा थेट चंद्रासारखा तेजस्वी चेहरा पाहून थक्क व्हायचे सगळे जण. कोळणीने थाटात बारसे केले. एक म्हातारी कोळीण म्हणाली, "कोजागिरीचा परसाद हाय ही पोर. तिचं नाव कोजागिरीच ठेवा. तिला कोजी म्हना, नायतर कोजाबाय म्हना. चंदरदेवाची केवढी किरपा...? आपली स्वोताचीच

ल्येक पाठवलीन् ऽ !" फार चांगली होती ही कोळीण. सगळे तिला मोठी आजी म्हणायचे.

चंद्रकन्या लाडाकोडात वाढत होती. चालू बोलू लागताच दर पौर्णिमेला ती किनाऱ्यावर रेतीत जाऊन बसे. आकाशात चंद्र दिसताच कोण आनंद होई तिला ! ती आकाशाकडे हात करून म्हणे, "बाबा, मी मजेत आहे. कोळीण आई माझे खूपखूप लाड करते. सगळा कोळीवाडा खूपखूप माया करतो. काळजी नका हं करू."

चंद्रकन्या त्या बेटावर आल्यापासून सगळीकडे समृद्धी पसरली. शेती, फुले, फळे...समुद्रातली मासळी–व्यापार सगळेच भरपूर !

चंद्रकन्या आता मोठी झाली. ती कोळीणबाईला मदत करायला पाही. मचवे आले की मासळी निवडायची. टोपल्या भरायच्या. जाळी सुकवायची–थोडी का कामे होती ! चंद्रकन्येचा प्रेमळपणा पाहून कोळीणबाईला नि कोळ्यांच्या नायकाला गहिंवरून येई. कधीतरी कोळीणबाईचे मन विषण्ण होई ती म्हणे, "बाई ग, पंधरावर्षांची झालीस की जाशील तू चंद्रदेवाकडे परत. तिथून मग सासरी ? मग मी काय करू ग ?..मला तर जगावसंच वाटणार नाही !"

चंद्रकन्या रानात जाई, सुंदर सुंदर फुले वेचत राही. सुरूच्या वनात जाई, तासन्‌तास गाणी गात राही–काही चंद्रलोकातली, काही कोळीवाड्यातली ! ती जरा दोन दिवस कोणाला दिसली नाही की ते म्हणत, "कोजाबाई ! कुठं ग होतीस ?..अग आम्हाला करमलं नाही गं..." छोटी मुले तर 'कोजी आक्का आली' करून तिच्या कमरेला मिठीच मारीत. पायांना विळखा घालीत ! कोजी

आक्का त्यांना फुलांच्या माळा करून देई, शंख शिपल्यांची नक्षी करून देई, छान छान गाणी म्हणून दाखवी, चंद्रलोकच्या गोष्टी सांगे. तिथल्या चेटकिणींच्या, पऱ्यांच्या, टिल्लच्यांच्या...चंद्रलोकच्या मोठाल्या भुयारात राहणाऱ्या राक्षसांच्या !

भर उन्हाळा ! एक दिवस त्या बेटाच्या किनाऱ्यावर एक जहाज येऊन थांबले, किनाऱ्यावर कोळी काम करीत होते. कोळणी काम करीत होत्या... कोळणीत चंद्रकन्यादेखील होती.

जहाजातली माणसे वर आली. एक अत्यंत रम्य बेट म्हणून या बेटाची ख्याती होती. म्हणून काही दिवस इथे विश्रांतीला ही माणसे आली होती. किनाऱ्यावरच्या कोळ्यांनी त्यांची चौकशी केली. जहाजाचा मालक कोळ्यांच्या नायकाला म्हणाला, " माझं नाव राजा पृथ्विनाथ. हा माझा मुलगा...राजपुत्र कुमार..इथं काही दिवस विश्रांती घ्यायची म्हणतो आहोत...जमल्यास तुमच्या या डोंगरात शिकार होईल. हे बेट तर सुंदरच आहे. तुमच्या या सुरूच्या बनात किंवा कुठं आमची राहायची सोय केलीत तर आभारी होईन. हवे तितके पैसे देईन तुम्हांला. "

नायक हसू लागला. म्हणू लागला, " सुरूच्या बनात खुशाल राहा. सगळी सोय करीन. पैशांचं म्हणाल तर आम्हाला काहीही कमी नाही. माझ्या या मुलीच्या, चंद्रकन्येच्या पायगुणानं इतकं मिळतंय आम्हाला की, संपवून संपायचं नाही. तुम्हालाच हवं ते खुशाल मागा. आम्ही पण म्हणू की एक मोठा राजा इथं राहायला आला होता, त्याला आम्ही काहीही कमी पडू दिलं नाही..."

राजा पृथ्विनाथाने सुरूच्या बनात एक सुंदर डेरा उभारला. ते डोंगराच्या जंगलात शिकारीला जात. किनाऱ्याच्या आस-

पासच्या भागात छोटया होडयांतून हिंडत. मासे पकडत. किनाऱ्यावर फेरफटका करताना कोळयांची गाठ पडे. गप्पा गोष्टी होत. पलीकडे कोळणी काम करीत. एकदा संध्याकाळी लहान मुलांच्या घोळक्यात कोजी समुद्रकिनारी हिंडत होती. पृथ्विनाथाने नि राजपुत्राने तिला पाहिले. इतकी मोहक मुलगी पाहिलीच नव्हती त्यांनी कधी. वेगळीच सुंदर! पृथ्विनाथाने एका मुलाला विचारले, "कोणाची रे मुलगी ती..."

मुलगा म्हणाला, "ती तर आमची कोजी आक्का!...मोठया काकांची मुलगी...चंदरदेवानं पाठवलेली!..."

पृथ्विनाथाने कोळयांच्या नायकाजवळ तिची चौकशी केली... त्याने सगळी कथा सांगितली. पृथ्विनाथ म्हणाला, 'माझ्या मुलासाठी मी तिची चौकशी करतोय...मला फारच आवडली ही मुलगी...त्याला तर आवडलीच आहे."

नायक म्हणाला, "मी आता सांगितलंच...चंद्रदेवाची मुलगी आहे ती. पंधरा वर्षांची झाली की कोजाबाई चंद्रलोकात परत जाणाराय...आम्ही कोणी अडवू शकणार नाही तिला...आमचं सारं बेट दुःखानं वेडपिसं होईल..."

पृथ्विनाथ आश्चर्यचकित झाला. त्याने चंद्रदेवाची आराधना करायचे ठरवले. वास्तविक पृथ्विलोकापेक्षा चंद्रलोकाचा मान कमीच, तरीही पृथ्विनाथाने चंद्रदेवाची विनवणी करायचे ठरवले.

पृथ्विनाथाने चंद्रदेवाची एक सोन्याची मूर्ती करवली. रोज तो तिची पूजा करी. दर पौर्णिमेला उपास करी. एक दिवस चंद्रदेव त्याच्या स्वप्नात आला. म्हणाला, "राजा, चंद्रलोकाची मुलगी पृथ्वीवर कायम कशी राहणार? भलतं वेड घेऊ नकोस. पंधरा वर्षांची होताच तिनं माझ्याकडे यायचा कोळीणबाईशी माझा

करारच झालाय. चंद्रकन्या माझ्याकडे प ्त येताना तिला बिचारीला किती दु:ख होईल ! पण सोसणार आहे ती ते दु:ख. . . राजा, तुझा हट्ट सोडून दे . . . ”

राजा दु:खी झाला. त्याला काही सुचेना. राजपुत्राला हे स्वप्न सांगायचे तरी कसे ? आणखी वीसेक दिवसांनीच तर कोजागिरी! त्याने मनात ठरवले. ‘ चंद्रकन्येलाच गळ घालायची. सगळे कोळी मला साथ देतील. त्यांना तर त्यांची कोजी, त्यांची कोजाबाय हवीच आहे. तिच्या शिवाय तर चैनच पडत नाही त्यांना. . .

नायकाच्या परवानगीने राजा पृथ्विनाथाने चंद्रकन्येची परोपरीने समजूत घातली. विनवणी केली. पण तिचे उत्तर एकच, “ माझ्या बाबांकडे मला जायलाच हवं. माझ्या कोळीआईशी करारच आहे तसा. . . माझ्या आईनं, बाबांनी, सबंध कोळींवाड्यानं किती लाडलाड केले माझे. त्यांना सोडून जाताना मला किती दु:ख होतंय . . . पण माझ्या चंद्रलोकात जायलाच हवं मला . . . ”

कोजागिरीचा दिवस. चंद्रकन्या आज पंधरा वर्षांची पूर्ण झाली. आज संध्याकाळी ती आपल्या चंद्रलोकात जायला निघणार होती. गेले पंधरा दिवस, जो तो तिला जेवायला बोलावी. तिच्या आवडीचे पदार्थ मुद्दाम करी. तिला नव्या साडीचा अहेर करी. सुंदर सुगंधी फुलांनी तिची वाडी भरी. बोलून चालून ते फुलांचेच बेट.

कोळ्यांचा नायक व त्याची बायको, म्हणजे चंद्रकन्येची कोळी आई उदास झाली. संध्याकाळ झाली. सगळा कोळीवाडा एकत्र जमला. राजा पृथ्विनाथ, राजपुत्र, त्यांचे इतर लोक, सगळे आले तिथे. चंद्रकन्येने आपल्या आई-बाबांना नमस्कार केला. मोठ्या आजीला नमस्कार केला.

सबंध बेट चंद्रकन्येला निरोप द्यायला निघाले. चालत सगळे लोक डोंगर पायथ्याशी आले. लोकांचे हुंदके आवरेनात. अश्रू थांबेनात. चंद्रकन्येच्या आई-बाबांनी तिला अखेरची मिठी मारली. खूप कुरवाळले.

आता चंद्रकन्या सर्वांच्या पुढे चालू लागली. डोंगर चढू लागली. भराभर चढणी चढत होती ती. पंधरा वर्षांनी चंद्रदेव भेटण्याची ओढ होती मनात. काही लोक तिच्याबरोबर थोडे अंतर गेले, पण मग परतले तिथून. राजा पृथ्विनाथ व राजपुत्र कुमार मात्र जातच राहिले तिच्याबरोबर. चंद्रकन्येने त्यांना परत जायसाठी खूप विनवण्या केल्या, पण व्यर्थ. त्यांना आशा होती, चंद्रकन्येचे मन विरघळेल. राजपुत्राशी लग्न करून पृथ्वीची सम्राज्ञी होण्यासाठी ती परतेल.

डोंगराच्या वरच्या भागात ढगच ढग होते. काहीच नीट दिसेना-इतके धुके ! वारा तर तुफान होता. चंद्रकन्या शिखरावर जाऊन पोहोचायला जराच अवकाश होता.

उलट सुलट धक्के खात, वादळी पिसाट वाऱ्यात, पृथ्विनाथ व राजपुत्र कसे तरी पुढे जात होते. ते आता हेलकावे खाऊ लागले. धुक्यात गुरफटून गेले ! इतके की ते ना वर जाऊ शकत, ना खाली ! वारा नेईल तिकडे ते फेकले जात होते.

चंद्रदेवाचे हरीण आपले उंच कान नि टपोरे डोळ टवकारून शिखरावर चंद्रकन्येची वाट पाहत होते. चंद्रदेव आकाशातून एकटक पाहत होता शिखराकडे. पंधरा वर्षांनंतर त्याची लाडकी चंद्रकन्या त्याला आज भेटणार होती.

ठीक बारा वाजले... मध्यरात्र ! चंद्रकन्या शिखरावर पोचहोली. लगेच हरणाच्या पाठीवर बसली. या ढगावरून त्या

ढगावर झेप घेत हरीण अवकाशात अदृश्य झाले ! हरणाच्या पाठीवर बसताना चंद्रकन्या धुक्यात गुरफटलेल्या पृथ्विनाथाला नि राजपुत्राला म्हणाली होती, "क्षमा करा मला—क्षमा करा... तुमच्या मनाला मी फार दुःख देतेय.. कळतंय मला ते... पण काय करू मी ?... क्षमा करा मला..."

चंद्रकन्येच्या या शब्दांनी रडू कोसळले त्यांना. त्यांच्या अश्रूंचे असंख्य दंवबिंदू बनले.. हिरव्या हिरव्या पानांवर नि तृणपात्यांवर झरझर ओघळले ते.. लखलखत्या चिमुकल्या हिरकण्यांसारखे. धुक्याच्या माऱ्यात, घोंघावत्या भन्नाट वाऱ्यावर भिरभिरत, राजा पृथ्विनाथ आणि राजपुत्र कुठे गेले ते कळलेच नाही कोणाला !

बेटावरच्या कोळयांनी डोंगराच्या पायथ्याशीच जागवली ती कोजागिरी. पण आजची कोजागिरी दुःखाची होती. अतिशय दुःखाची. पंधरा वर्षांपूर्वी याच दिवशी चंद्रकन्या, चिमुकली कोजी होऊन पृथ्वीवर आली होती. त्याच दिवशी आज ती चंद्रलोकात परत गेली. ती म्हातारी कोळीण म्हणजे मोठी आजी म्हणाली,

"आपल्या या डोंगराला आजपासनं कोजागिरीच म्हनू या. हाव डोंगर चढून म्हंजी 'गिरी' चढून आपली 'कोजा'बाय चंदरदेवाकडे परत गेली...कोजागिरीच या डोंगराचं बी नाव..."

दर कोजागिरीला चंद्रदेव कोजागिरी नावाच्या या उंचच उंच डोंगरावर हटकून आपल्या सुधेचा वर्षाव करीत राहातो ! आणि बाराही महिने फुलाफळांनी डवरलेला, हिरवागार ठेवतो त्याला.

□ □ □

## २ : महापूर




एकदा शंकर आणि पार्वती महाबळेश्वरी एका रम्य वनात मजेत फिरत होती. विविध डोंगरांच्या पायथ्याशी असलेल्या छोट्या छोट्या खेड्यांकडे लक्षपूर्वक पाहात होती. पार्वतीच्या मनात चटकन एक कल्पना आली. ती शंकराला म्हणाली,

" आपण लांबूनच ही गावं अशी पाहण्यात काय अर्थ ? त्यापेक्षा ..."

" त्यापेक्षा आपण तिथं प्रत्यक्षच जाऊ या. असंच ना ? " शंकरांनी हसत म्हटले.

" तेच म्हणते मी. म्हणजे लोकांची सुखदु:खं कळतील. लोक कसं वागतात ते कळेल. आपण त्यांच्यासाठी काय करायला हवंय ते कळेल." पार्वती म्हणाली.

त्यावर शंकर म्हणाले, " छान आहे कल्पना. उद्या परवाच निघू. शेतकऱ्याचा वेष घेऊ आणि जाऊ."

एकदोन दिवसांनीच शंकर व पार्वती दोघांनी फाटके मळके कपडे अंगात घातले. ते दुष्काळातले गरीब शेतकरी बनले. बऱ्याच प्रवासानंतर एका खेडेगावी आले ते. एक मराठमोळे खेडेगावच म्हणाना. नुक्ताच सूर्योदय झाला होता. त्याच्या झळाळत्या प्रकाशाने आकाश भरले होते. सुंदर सोनेरी सकाळ. पण गाव काही फारसे स्वच्छ दिसेना. टापटीप तर कुठेच नव्हती. काही झोपड्यांचे बांबू निघालेले, काही घरांची कौलं अस्ताव्यस्त झालेली, अंगणातली फुलझाडं मरगळलेली, जागोजागी शेण साचलेलं, लाकुडफाट्याचे ढीग अंगणभर पसरलेले ! माणसांना जागच नव्हती, मग गुरांना चरायला कोण नेणार ? सूर्य चांगला वर आला होता तरी शेतावर जायची कोणाला घाई नव्हती.

तसं पाहिले तर गावात एक नदी झुळझुळत होती. शेताची माती काळीशार होती. नदीकाठची रानं हिरवीगार होती. तरीही गावाचा हा अवतार !

कोवळं ऊन झळकत होतं. शंकरांनी एका बऱ्याशा दिसणाऱ्या घराचं दार ठोठावलं. एका माणसाने तांबारलेले डोळे चोळत दार उघडलं. अंगावर खेकसत तो म्हणाला, ‘ लोकांच्या झोपा मोडाय कोन आलाय रं सकाळी सकाळी ? सूर्यसुद्धा पुरता वर आला नसंल. तो न्हायल्ये उभे कर्जदारावानी... काय पायज्ये ? अँऽ ?.... ’

पार्वती म्हणाली, “ आम्ही गरीब शेतकरी हाओत. गेल्या वर्साला गावी दुस्काळ पडला. अजून पानी न्हाई ! म्हनून निगालो मोलमजुरी शोधाय... चालून चालून दमलो, म्हणून या गावात थांबलो वाईच... मोलमजुरीबी... ’

घराचा मालक जोरात ओरडला, “ दुस्काळ पडला म्हनून भीक मागाय आलाय व्हय ?... मोलमजुरीचं नाव निस्तं... म्हनं दमलो ! चालते व्हा आपल्या गावी परत... मरत का न्हाई तिथंच... दुस्काळ म्या पाडला व्हय ? ”

शंकर म्हणाले, ‘ गरीब झालो म्हणून भीक न्हाई मागनार... हितं न्हाई जमलं तर पुढलं गाव हायेच... ’

तो माणूस अंगावर येत म्हणाला, “ बऱ्या बोलानं जाता की न्हाई हितनं ...? सकाळंच ज्येवान म्या वाढून ठिवलंय व्हय तुमच्यासाठी ...?” त्याने धाडकन् दारच बंद करून घेतले.

शंकर-पार्वती तिथून निघाले. पुढे आणखी एका घराशी आले. तिथे गोठ्यात एक बाई म्हशीची धार काढीत होती. शंकर म्हणाले, “ ताईऽ ! आम्ही दुस्काळाच्या गावाहून आलो.... वाटसरु हाओत... काही मोलमजुरी... ’

रिकामी चरवी हातात तशीच घेऊन ती बाई हातवारे करीत रागारागात म्हणाली, ‘ मेल्यानो, दुस्काळात कशापायी हितंच आलात ? माझ्या म्हशीच्या धारेचं निरसं दूध प्याया व्हय ?... का म्हशीला दिरीष्ट लावाय आलात ? चालते व्हा आंदी. ’

शंकर-पार्वती पुढच्या काही घरी गेले. तिथंही कोणी थारा देईना त्यांना. लहान मुले वाकोल्या दाखवीत, कोणी खडे मारीत. एका घरी एक बाई ओसरी सारवत होती. तिने ‘ ही घ्या मोल-मजुरी–’ म्हणून शेणाचा गोळाच फेकला त्यांच्या अंगावर ! अधेमधे दोनचार घरी शिळ्या भाकरीचे तुकडे नि तोंडी लावणे मिळाले त्यांना, पण खूप शिव्या खाल्यावर. यापेक्षा अधिक चांगले स्वागत कुठेच झाले नाही.

दुपार टळली. शंकर पार्वती भुकेली होती. दुष्काळातल्या शेतकऱ्यांचे सोंग तर बेमालूम करायचे होते. दोघेही नदीवर गेली. नदीच्या स्वच्छ गार पाण्यात हातपाय तोंड धुतले त्यांनी. मग ती एका मोठ्या आंब्याच्या झाडाखाली बसली. दोघांनी मिळा-लेले शिळे अन्न जेवायला सुरुवात केली. नदीवर कोणी माणसे येत; पण सगळे आपल्याच ताठ्यात. पार्वती शंकराला म्हणाली, ‘ बरं झालं आपण इथं आलो, कळली तरी इथली माणसं ; ’

शंकर म्हणाले, ‘ किती विचित्र लोक ! आळशी तर आहेतच. शिवाय ही घमेंड ! सुरेखशी, भर उन्हाळ्यात वाहणारी नदी आहे. काहीही पिकेल इतकी सकस जमीन आहे. फळाफुलांनी, दुधतुपानं, दाणादुण्यानं गाव भरगच्च भरलं आहे. म्हणूनच ही अरेरावी ! ’

पार्वती म्हणाली, ' बरोबर आहे. आयतं पायाशी आहे नं सगळं. जेव्हा खूप कष्टानं मिळवावं लागतं, तेव्हाच माणूस आपला अर्धा घास पटकन् दुसऱ्याला देतो. त्याला दुसऱ्याचा भुकेचा पीळ समजतो. '

शंकर-पार्वतीचे जेवण आटोपले. मग ती त्याच गावात आणखी थोडी घरे फिरली. सर्वांचा एकच नमुना. गावाबाहेरच्या एका देवळाशी आली ती. पुजाऱ्याने प्रसादाची दोन केळी दिली. देवळाच्या पडवीत दोघेही झोपून गेली. दुसऱ्या दिवशी पहाटेसच ती पुढल्या गावाकडे निघाली.

दहा-पंधरा कोसांची चाल झाली. एका गावाशी आली तो. इथेही नदी लागली. मात्र नदीत पाणीच नव्हते. जिथेतिथे दगड गोटे आणि पाण्याची डबकी साचलेली ! शंकर पार्वतीला म्हणाले, ' देवी, मुद्दाम आणलंय मी या गावी तुम्हाला. '

' मुद्दाम ...? का बरं ...? ' पार्वती.

' कळेल आपोआप. ' शंकर म्हणाले. इतक्यात काही अंतरावर शेती लागली. जमीन भरड नापिक होती. शेतकरी नांगरट करताना घामाने भिजून निघत. झाडे नाहीत, सावली नाही. शंकर-पार्वतीही उन्हाने घामाघूम झाली होती. एका शेतकऱ्याने त्यांना दुरूनच हाक घातली. ' रामराम पाव्हनं, कुनीकडनं येणं क्येलं ?'

शंकर म्हणाले, " काय सांगायचं दादा ! गावाला गेल्या वर्सा-पासनं दुस्काळ हाये. आता तर इहिरीबी कोरड्या. शेती हाय आमची, पर उप्येग काय ? मोलमजुरी शोधत आलूय इथवर. '

' आसं म्हंता व्हय ?' शेतकरी म्हणाला. ' इथबी त्येच व्हायचंय. पावसाचं आवंदा नाव न्हाई. नदीला पानी न्हाई ! नदीबी अशी

की पूर आला की पिसाटावानी व्हती ...! समदं धुवून न्येती ! पर चिंता करू नका.... काढू दिस आपुन कसंबी.' शेतकऱ्याने बोलणे पूर्ण केले.

शंकर पार्वती आणखी पुढे गेली. आणखी एक शेत लागले. जमीन तशीच नापिक, पण शेतकऱ्याने मोठ्या जिद्दीने ती नांगरली होती. कडकडीत दुपार. हातपाय धुऊन शेतकरी एका बाभळीच्या झाडाखाली बसला. त्याच्या बायकोने टोपल्यातून भाकरी नि मिर्च्यांचा ठेचा काढला. शेतकऱ्यानें शंकर-पार्वतीला पाहून म्हटले, 'कुठून आलात पाव्हनं ? दमल्येलं दिसताय. या उन्हात इथं कुठं बरी ?'

शंकर पार्वती म्हणाली, 'काय सांगनार भाऊ ! वरीस झालं-ना पाऊस, ना इहिरीला पानी ! दुस्काळ पडलाय साऱ्याभर... मोलमजुरीसाठी भटकत आलूय इथं."

शेतकरी हसत म्हणाला, "म्हंजी येकून येकच...इथंबी त्येच व्हनार हाय...हाये पावसाचं टिपुस ?...महिना गेला कोरडा ! "आंदी बसा अश्ये...तुकडाभर भाकर खा...मंग बोलू..." शेतकरणीने दोघांना तांब्याभर पाणी दिले हातपाय धुवायला.

डोक्यावर ऊन रणरणत होते. सावली तर नव्हतीच. शंकर-पार्वती शेतकऱ्याशेजारी बसली. त्याने आपल्या जेवणातला अर्धा वाटा त्यांना दिला. चौघेही जेवली. शंकर-पार्वतीने आभार मानले.

शेतकरी म्हणाला, "सांजच्याला गावातली दोनच्यार मानसं जमवू आपण...करू काहीतरी वेवस्था तुमची. अव ऽ, आपण समदी सारखीच !...परसंग समद्यांनाच हाये ऽऽ !"

संध्याकाळी गावकरी जमले. शंकर-पार्वतीची परिस्थिती ऐकून त्यांनी ठरवले, दोघांनाही ठेवून घ्यायचे. आळीपाळीने प्रत्येक घरी आसरा द्यायचा. त्यांच्याने जेवढे होईल तेवढे त्यांनी प्रत्येकाकडे घरातल्या माणसाप्रमाणे काम करावे. रानातून लाकुडफाटा आणण्यापासून तो शेतांतल्या कामापर्यंत जे जमेल ते करावे.

काय नवल ! चारच दिवसांनी पाऊस आला. तब्बल पाचसहा दिवस धो धो कोसळला. नदी तुडुंब भरली. शेतकरी हसले. पेरण्याही झाल्या.

नदीला टेकूनच डोंगर होता. शंकर पार्वती काही शेळ्यामेंढ्या चरायला नेऊ या. पार्वती म्हणाली, " डोंगरावरच कशासाठी ? सगळीकडे हिरवळ आहे आता तर ! " शंकर म्हणाले, " कळेल तिथं गेल्यावर "

नदीला टेकूनच डोंगर होता. शंकर पार्वती काही शेळ्यामेंढ्या घेऊन गेली डोंगरावर–शंकरांनी शेतकऱ्याचा वेष टाकला. मूळ स्वरूप घेतले. व्याघ्रांबर, जटाभार, जटेतली गंगामाई-सगळे होते. पार्वती पाहतच राहिली. कमरेवर हात देऊन उभे राहत शंकरांनी गंभीर स्वरात आज्ञा केली, " पवित्र गंगादेवी, जोरात अगदी वेगात पाणी वाहव आपलं...इतक्या झपाट्यात की या गावाची तुडुंब नदी भीषण रूप घेईल...आपल्या बेभान पुरानं, प्रलयानं सारा गाव उध्वस्त करील ! "

पार्वती मोठ्यांदा ओरडली, " देवा ! झालंय काय तुम्हाला ? ज्यांचं अन्न खाल्लं, त्यांच्याशी ही कृतघ्नता ?...गंगाताई, थांब ताबडतोब. " शंकर अधिक करड्या आवाजात ओरडले, " गंगा-

देवी, आज्ञा आहे माझी. वाहव पाणी...क्षणही घालवू नको, सोड महापूर.

पार्वती शंकराच्या पायाला विळखा घालीत, हमसाहुमशी रडत म्हणाली, "देवा, काय आरंभलंत हे? काय अपराध या गावकऱ्यांचा?"

शंकर म्हणाले, "देवी, शांत व्हा. या सज्जन कष्टाळू गावकऱ्यांना इथून हलवायला हवं. हे गाव उद्ध्वस्त होतंय हे पाहताच हे लोक आजुबाजूच्या अनेक गावात पांगतील. मोती विखरावेत तसे विखरतील. मोठ्या हिमतीनं तिथं वस्ती करतील. आपलं सौजन्य, कष्टाळूपणा, प्रेमळपणा सारं चौफेर पेरतील."

पार्वती म्हणाली, "पण यांचं का नुकसान करायचं?"

शंकर म्हणाले, "तेच सांगतो. बऱ्या गावात जाऊन कमी कष्टात स्वतःला निश्चितच पुन्हा सुखाचे दिवस आणतील. तिथल्या आळशी, ऐदी, माणुसघाण्या माणसांना माणसासारखं जगायला शिकवतील...प्रलय झाल्याशिवाय हा गाव ते कधीच सोडायचे नाहीत...या निकृष्ट मातीवरही अलोट प्रेम आहे त्यांचं...हेच प्रेम ते तिथल्या मातीलाही देतील..."

"तसंही होईल कदाचित!" म्हणत पार्वती दूर उभी राहिली डोळ्यातल्या आसवांना महापूर आला होता.

नदीचा वेगवान धावता पूर नि काळे आभाळ पाहून गावकरी चपापले. म्हणाले, "महापूर?...होऽ? शंकाच नको! हाती मिळेल ती वस्तू नि गुरेवासरे, शेळ्यामेंढ्या, मुले-बाळे, आजारी

म्हातारी माणसे, घेऊन ते चारी दिशांना धावत सुटले. वाट फुटेल तिथून दुसऱ्या गावाकडे सैरूट धावत सुटले. पुराचा महापूर झाला होता. धो धो पाऊस आभाळ फुटल्यागत कोसळत होता. त्याला गंगामाईची साथ होती ! गाव ओसाड झाला. ओसाड !

परन्तु ?–परन्तु आणखी दोन-तीनच वर्षांत बरीच आजूबाजूची आणि काही लांबवरची गावे सुद्धा टवटवीत झाली होती. प्रसन्नतेने बहरली होती.

तिथे शिस्त होती, सुंदरता होती. कष्ट होते, विपुलता होती. माणुसकी तर ओसंडत होती.

□ □ □

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क. २३२ दिनांक ......
किशोर क. २११

## ३ : पोपट आणि इंद्रदेव




वाराणशी हे भारतातले एक फार मोठे तीर्थक्षेत्र तिथलीच गोष्ट. हजारो वर्षांपूर्वी वाराणशीच्या आजूबाजूला घनदाट अरण्ये होती. अरण्यात खूप मोठाले, डेरेदार नि उंचचउंच वृक्ष होते. जागोजागी वेलींच्या दाट जाळ्या होत्या. वृक्ष नि वेली, रोपे नि

झुडपे फळाफुलांनी गच्च भरली होती. वृक्षांच्या फांदयांत आणि वेलींच्या जाळयात अनेक रंगदार, लहान मोठया पक्ष्यांनी वस्ती केली होती.

परंतु एके दिवशी एक वेगळीच घटना घडली. वाराणशीच्या आजूबाजूच्या त्या अरण्यांपैकी एका खूप मोठया नि निबिड, पण सुंदर अरण्यातले वृक्ष एकाएकी थरथर कापू लागले! त्यांच्या फांद्या जोरजोरात सळसळू लागल्या! कारण?... कारण इंद्रदेव पृथ्वीवरच्या वनश्रीची पाहणी करायला स्वर्गातून येत होता. त्याच्या दैदीप्यमान तेजाने आणि त्याच्या लवाजम्याच्या आवाजाने मोठीच खळबळ उडाली होती त्या अरण्यात.

इंद्रदेव विस्मित झाला, इतके घनदाट नि इतके टवटवीत अरण्य पाहून. तऱ्हतऱ्हेची पाने, फुले, फळे असलेले लहानमोठे सुंदर हिरवेगार वृक्ष व वेली पाहून थक्कच झाला तो. अरण्यात ठिकठिकाणी तळी होती. त्यांत कितीतरी रंगांची मनोवेधक, विशाल कमळे होती. कितीतरी वेळ त्या कमळांकडे टक लावून पाहतच राहिला इंद्रदेव.

असे वृक्ष, अशा वेली, अशी कमळे त्याने प्रत्यक्ष आपल्या स्वर्गातल्या उदयानातच काय, पण खुद्द नंदनवनातही पाहिली नव्हती म्हणे. रंगीबेरंगी फुलांच्या धुंद सुगंधांनी मोहिनीच घातली इंद्रदेवावर. परंतु तेवढयात, त्या रम्य समृद्ध वृक्षवेलींच्या घोळक्यात एक वेगळाच वृक्ष दिसला इंद्रदेवाला! एक खूप मोठा परन्तु अजब वृक्ष! त्यावर ना हिरवे पान होते, ना एखादे फूल! त्याच्या फांदयांना, खोडाला, बुंध्याला भव्य मोठया भेगा गेल्या होत्या. हिरव्या, करडया रसरशीत सालींऐवजी ढलप्या धरल्या होत्या

सगळीकडे. कशाने तरी अचानक करपलेला, वठलेला वाटत होता तो वृक्ष !

फार फार आश्चर्य वाटले इंद्रदेवाला. 'या हिरव्यागार रम्य अरण्यात हा एकच वृक्ष असा कसा ?' असे स्वतःशीच म्हणत इंद्रदेव त्या वृक्षाच्या अगदी जवळ गेला. पाहतो तो त्याच्या एका उंच फांदीवर एक पोपट बसलेला ! पोपट खूप रोड दिसत होता, आजारी दिसत होता.

इंद्रदेव पोपटाला म्हणाला, "अरे, एऽऽ! मूर्खच दिसतोस तू तर. हा वृक्ष शुष्क झालाय, साफ...करपून मेलाच आहे जवळ-जवळ. इथं तुझ्या आजूबाजूला तऱ्हतऱ्हेच्या फळांनी बहरलेले केवढे हिरवेगार नि सावलीदार वृक्ष पसरले आहेत दाटीवाटीनं! तरीसुद्धा इथं या कोळपलेल्या शुष्क वृक्षाच्या फांदीवर, वाळक्या पानांतल्या मृत्यूच्या सावलीत, असा का बसलास खुळ्यासारखा?"

पोपटाने आपल्या पायापर्यंत आपली मान वाकवून लवून नमस्कार केला इंद्रदेवाला. मग म्हणाला, "राजाधिराज, सांगतो कारण. एकेकाळी हा वृक्ष इतका सुंदर होता, इतका बहरलेला असायचा, आपल्या मधुर फळांनी नि रंगदार किरमिजी फुलांनी! ...त्या फुलांचा अप्रतिम मोहक सुगंध कितीतरी दूर फैलावत जाई. वर्णनच करता येणार नाही इतका अद्वितीय सुगंध असायचा तो! ...सगळ्या वृक्षांत त्याच्याइतका मजबूत नि मनोहर वृक्ष नव्हता. महाराज, त्याच्याच पाना-फांद्यांतल्या आमच्या घरट्यात माझा जन्म झाला. त्याच्याच पाना-फांद्यांच्या गर्द छायेत, त्याच्याच रसरशीत फळांवर मी पोसलो, वाढलो. त्याच्याच धुंद सुगंधात विसावलो, डोलली, सुखावलो. त्याच्याच फांद्यांवर मी

उडायला शिकलो ! ... महाराज, या वृक्षानं माझ्या बाळपणा-पासून मला पित्याच्या मायेनं आश्रय दिला, आईच्या मायेनं आपल्या कुशीत, आपल्या पानांखाली वाढवलं ! आता सांगा, कसा, ... कसा जाऊ मी इथून ? ... कसा कृतघ्न होऊ ? "

इंद्रदेवाने विचारले, " मग या वृक्षाचं ते सारं पानाफुलांचं वैभव नाहीसं का झालं ? ... हा तर कोळपलाय पार ! "

पोपट म्हणाला, " तेच ऐका महाराज. हल्लीच एक दिवस एक शिकारी इथं आला. या सुंदर बहरलेल्या वृक्षावरून त्याची दुष्ट नजर फिरली. गमतीचा खेळ म्हणून भयंकर जालीम विषानं जहरी केलेला आपला बाण, केवळ मजेखातर या वृक्षाच्या सालात त्यानं घुसवला, त्या सालीत ते विष एका क्षणात भिनलं. आणि तत्काळ, अगदी पाहता पाहता हा वृक्ष असा उभाच्या उभा जळून निघाला ! ... एकाएकी असा करपल्यानं आता तो मरतोय ... राजाधिराज, या माझ्या अश्रयदात्या वृक्षाला का मी अंतर देऊ... त्याच्या दुःखाच्या क्षणी का त्याला सोडून जाऊ ? "

इंद्रदेवाला गहिवरून आले एकदम. पोपटाची कृतज्ञता आणि त्याचे त्या वृक्षावरचे अलोट प्रेम पाहून चकित झाला तो. त्याचे डोळे पाणावले. गळा दाटून येत इंद्रदेव म्हणाला, ' प्रेमळ पाखरा, बुद्धीची मिजास मिरवणारी माणसं जर आपल्या मात्या-पित्याशी, आश्रयदात्यांशी नि मित्रांशी इतक्या इमानानं नि सौजन्यानं वागतो तर ... केवढं मोठं तत्व शिकवलंस तू मला तुझ्या या वागणुकीनं ... काय बक्षीस देऊ तुला मी त्याबद्दल. छोटया पक्ष्या, ... तुला हवं ते वरदान माग ... निःशंक माग..."

पोपट म्हणाला, " देवाधिदेवा, खरंच मागू ... या माझ्या वृक्षाला पूर्वीसारखं करा. एवढंच मागणं मागतो. ... या देणगी-बद्दल महाराज, माझ्या आयुष्यभर मी आपले पोवाडे गात राहीन. आयुष्यभर आपला ॠणी राहीन ... "

इंद्रदेवाने चटकन त्या वृक्षाला स्पर्श केला. काय नवल ! पाहता पाहता त्याची शुष्क पाने नि जळक्या ढलप्या गळून पडल्या. खपल्या, जळमटे सगळे पटापटा गळून पडले. वाळकी पाने गरगरत खाली येताना किती मजेदार दिसत होती ... हां हां म्हणता जमिनीवर हा सडा पडला त्यांचा !

त्याचवेळी फांद्याफांद्यांत चैतन्य भरले. झरझर हिरवीगार नि तांबूस पालवी फुटली त्या फांद्यांना. दूरवर धुंद सुगंध पसरवणारी असंख्य किरमिजी फुले पटपट फुलली... प्रत्येक डहाळी फुलारली. मोहकतेने न्हाऊन निघाला तो वृक्ष–थेट पूर्वीसारखाच. साऱ्या अरण्यातला, पुन्हा एकदा एकमेव अप्रतिम सुंदर वृक्ष बनला तो.

इंद्रदेव आपल्या बरोबरच्या अधिकाऱ्यांना म्हणत होता, " खरोखर, जिवापाड नि वात्सल्यपूर्ण मैत्री करावी ती या वृक्षानं केली तशी; आणि सहृदयता नि कृतज्ञता बाळगावी ती या पोपटानं बाळगली तशी ...! धन्य आहेत दोन्ही–धन्य आहेत ! "

□ □ □

# ४ : दूरदर्शी

एक दिवस भगवान शंकर व पार्वती फिरायला निघाले. जरा वेळ फिरल्यावर पार्वती म्हणाली, "भगवन्, आपण आज यम-राजांना भेटून येऊ या ? कितीतरी दिवस झाले भेटलोच नाही."

शंकरांना कल्पना आवडली. दोघेही यमराजाच्या पाताल नग-रीत आले. राजवाड्याशी येऊन थांबले. त्यांना पाहताच द्वार-पालांची कोण धांदल ! लगेच यमराजांकडे वर्दी गेली.

ते आपल्या दरबारात आपल्या दूतांना सूचना देण्यात मग्न होते. दुसरे दिवशी कोणत्या गावातल्या कोणत्या घरातून कोणाला यमनगरीत आणायचे, केव्हा आणायचे याबद्दल या सूचना होत्या. शंकर-पार्वती आल्याचे कळताच सूचना अर्ध्या टाकून यमराज लगबगीने उठले. महाद्वाराशी पाहुण्यांना सामोरे गेले. उत्तम स्वागत करून पाहुण्यांना त्यांनी दरबारात आणले. सर्व दूतांनी त्यांना अभिवादन केले.

यमराज पाहुण्यांना म्हणाले, "तुम्ही आलात तेव्हा मी या मंडळींना उद्याच्या महत्त्वाच्या सूचना देत होतो. त्या जरा पूर्ण करतो. हं...म्हणजे मग आपल्याला स्वस्थपणे बोलता येईल. चालेल नं ? "

शंकर हसत म्हणाले, 'चालेल, चालेल. उद्या कोणाकोणाच्या प्राणांवर हल्ला होणाराय ते आम्हालाही कळेल !"

यमराजांनी सर्व दूतांना त्यांची कामे सांगितली. त्यातल्या एकाला ते म्हणाले, " आणि हे पाहा त्या ∴∵ गावी, चिंचोळ्या बोळातल्या एका अर्धवट मोडक्या पिवळ्या घरात एक बाई उद्या आपल्या बाळांना जन्म देणार आहे, दोन जुळी भावंडं ! ती बाळ जन्मली की तत्क्षणी त्या बाईला इथं आणायचं. काय समजलं ?"

पार्वती एकदम उद्गारली, " भयानकच !...त्या दोन बाळांचं काय ?...त्यातही जुळी म्हणजे अशक्त !...कशी जगतील ? केवढा निर्दयपणा होईल यमदादा..."

यमराज गंभीरपणे म्हणाले, " बाळांच्या भल्यासाठीच हा निर्दयपणा. पुढच्या भल्यावर नजर ठेवून असलं कठोर काम करावं लागतं...ताई, संधी मिळताच मी हे पटवून देईन."

यमदूत आपापल्या कामगिरीवर निघून गेले. शंकर-पार्वतींनी यमराजांशी बऱ्याच गप्पा मारल्या. यमदूतांचा विषय निघताच पार्वती मात्र म्हणाली, " तुम्ही काहीही म्हणा यमदादा; पण ज्यांचं माणूस तुम्ही घेऊन येता, त्यांना केवढ्या दुःखात लोटता ! कित्येकांवर इतर अनेक अवलंबून असतील, तर कित्येकांची तर इच्छाही नसेल इथं यायची...तिथं अनेकांची दैना होत असेल, अनेक निराधार होत असतील..."

आणि यमराज लगेच म्हणाला. " ताई, खरोखर असं काहीही होत नाही. झाली तरी तात्पुरती गैरसोय ! प्रत्येकाच्या जीवनाची वाटचाल आधीच योजलेली असते. ती न ओळखणारांची मात्र दुःखद स्थिती होते. कोणत्याही अडचणी आल्या तरी प्रत्येकानं, त्याला टक्कर देऊन आपलं जीवन समर्थपणे जगायचं असतं. सांगतो नं. मी प्रत्यक्षच कधीतरी पटवून देईन हे." यमराजाचे हे म्हणणे न पटून शंकर-पार्वती अस्वस्थ मनानेच घरी परतले.

तीन वर्षे उलटून गेली. पावसाळा नुक्ताच संपत होता. दोन चार दिवसांनीच नवरात्रोत्सव सुरू होणार होता. त्यापुढे दसरा आणि पुढे वीस दिवसांनीच तर दिवाळी !

भाऊबीजेला दरवर्षीप्रमाणे यंदाही यमराज आपल्या बहिणीकडे म्हणजे यमुनेकडे येणार होते. यमराजांनी शंकर-पार्वतीला निरोप पाठवला. "काही फार महत्त्वाचं काम आहे. कृपया ताबडतोब भेटून जावं."

पार्वती शंकराला म्हणाली, 'कशाला बोलावलंय ? आपण आपल्या दूतांना कसे फटाफट हुकुम देतो ते मोठ्या आढ्यतेने दाखवायचं असेल ! नुकत्याच जन्मणाऱ्या बाळांच्या आईला मारायचं ही तर बहादुरी !"

शंकर शांतपणे म्हणाले, "पाहूया तरी काय काम आहे ते."

दोघेही यमराजाकडे आले. यमराजांनी प्रेमाने दोघांचे स्वागत केले. यमराज म्हणाले, "मला एका महत्वाच्या कामात तुमची मदत हवी आहे. पृथ्वीवर अनाम गावी तुम्ही राहायचं. बाजारपेठेत शिप्याचं एक छानसं दुकान काढायचं. शंकरजी, तुम्ही शिपी व्हायचं. पार्वतीताई, तुम्ही दुकानात बसून सर्व गिऱ्हाइकांचं निरीक्षण करायचं. दसरा-दिवाळीचा मोसम हा. खूपजण येतील दुकानात. भाऊबीजेच्या दिवशी यमुनाताईच्या घरी आपण सगळे भेटू. एकत्र भाऊबीज करू. दुकानातले अनुभव मला नीट कळवून घ्यायचेत. म्हणून तुम्हाला ही तसदी."

एक-दोन दिवसांनीच शंकर-पार्वती अनाम गावी आले. भरबाजारपेठेत छानसे दुकान थाटले दोघांनी. छान छान कपडे, सुंदर ढबींचे नमुनेदार कपडे यामुळे दुकानात गर्दी होई. लहान मुलांपासून तो वृद्धांपर्यंत चिकार गिऱ्हाईक असे.

दसऱ्याचा दिवस. संध्याकाळी एक तरुण जोडपे आपल्या तीन लहान मुलांना घेऊन तिथे आले. पैकी एक मुलगी होती. सुमारे सहा वर्षांची. बाकीचे दोन मुलगे. ते तिच्याहून जरा लहान. बाई शिप्याला म्हणाली, "अहो, या मुलीला छानपैकी परकर-चोळी करायचीय भाऊबिजेसाठी. आणि या दोघांना रेशमी सदरे छानपैकी."

शंकर तिन्ही मुलांना म्हणाले, "आहे बुवा !– जोरात भाऊबीज !"

मग ते त्या दोन मुलांना म्हणाले, "वाऽ! अन् हातात सोन्याच्या नव्या अंगठ्या झळकतायत आज ! दसरा म्हणून सोनं ? आई बाबा किती लाड करतात तुमचे ..."

इतक्यात तीन्ही मुले बाबांचा हात धरून रस्त्यावरची गंमत पाहू लागली.

ती बाई शिप्याला म्हणाली, "कसले लाड शिपीदादा, काय सांगू कथा ? ही दोन्हीही माझ्या धाकट्या बहिणीची जुळी मुलं ! ही मुलगी तेवढी माझी. या मुलांच्या जन्मवेळीच बहीण वारली. दारिद्र्यातून नि नवऱ्याच्या जाचातून सुटली एकदाची. सुदैवानं माझी स्थिती चांगली आहे, यजमान प्रेमळ आहेत, म्हणून ही मुलं मी वाढवतेय– माझी म्हणून ! फार गोड मुलं. मोठी झाल्यावर स्मरतील न स्मरतील, कोणी सांगावं ? पण आज तर माझं घर हसवताहेत." मुलांच्या कपड्यांची मापे झाल्यावर ती मंडळी निघून गेली.

भाऊबीजेला यमुनाताईनेही शंकर–पार्वतीला स्वतंत्र आमंत्रण दिलेच होते. दोघेही तिथे गेले. यमराजही आले. आरती, जेवण

झाले. भाऊबीज झाली. यमराजानें गमतीने शंकराला विचारले, "काय शिंपीदादा, काय म्हणतंय अनामगाव ?" शंकर-पार्वतीने आपले अनुभव सांगितले. त्यात त्या तीन्ही भावंडांची गोष्टही सांगितली.

त्यावर यमराज म्हणाले, "आठवतं ? ... तीन साडेतीन वर्षां-पूर्वी तुम्ही दोघंही माझ्याकडे आला होतात. दोन नवजात जुळ्या बाळांच्या आईचे प्राण आणायला मी तेव्हा माझ्या एका दूताला सांगत होतो आठवतं ? "

पार्वती एकदम म्हणाली, "आठवतं तर! हंऽऽ! म्हणजे दसऱ्याच्या दिवशी सोन्याच्या अंगठ्या घालून आपल्या मावशी-बरोबर आलेली ती छोटी मुलं म्हणजे तीच जुळी बाळं असावीत ! हो नं ? "

यमराज म्हणाले, "तीच ती ! त्यांच्या आईला मी का आणलं ते कळलं नं आता ? आज मावशीजवळ ती सुखात आहेत. आई-जवळ ती किती दुःखात असती ! नाहीतरी मोठेपणी प्रत्येकजण स्वतंत्र वाढत असतो. आई-वडिलांची गरज मानली तर असते-विशेषतः कृतज्ञ मुलांना. एरवी मुलं मोठी झाली की पाखरांसारखी दूर जातात. "

पार्वती मधेच म्हणाली, "खरंच यमराज, तुमचा दूरदर्शीपणा पटला मला. "

शंकर गालातल्या गालात हसत होते.

□ □ □

# ५ : राजकन्येचा पण




एक होता राजा. त्याला एकच मुलगी होती. ही राजकन्या नेहमी राजाच्या बरोबरबरोबर असायची, कारण ती त्याची अतिशय लाडकी होती.

राजकन्या मोठी झाल्यावर राजा एक दिवस तिला म्हणाला, " आता तू मोठी झालीस, तुझ्या बुद्धीला शोभेल असं शिक्षणही तुला मी दिलं आहे. अनेक कला शिकवल्या आहेत. आता लव-

करच एखादा छानदारसा मुलगा शोधून तुझं लग्न करायला हवं. हो की नाही ? देशोदेशीच्या राजपुत्रांना मी बोलवणं पाठवतो. त्यांच्यातून तुझ्या पसंतीला जो उतरेल त्याच्याशी धूमधडाक्यात तुझं लग्न करून देईन. माझ्यानंतर माझं अर्धं राज्यही त्याला दिलं जाईल."

राजकन्या म्हणाली, "बाबा, तुम्ही लग्नाची गोष्ट काढलीत म्हणून मी सांगते. मी माझ्या मनात पाच प्रश्न ठरवून ठेवले आहेत. जो कोणी त्यांची अगदी योग्य व माझ्या मनाला पटतील अशी उत्तरं देईल त्याच्याशीच मी लग्न करीन. मग तो अगदी रस्त्यावरचा भिकारी असला तरी चालेल."

राजान गावोगावी दवंडी पिटवली. राजकन्येचा पण जाहीर केला. अनेक लोक येत, तिच्या प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न करीत. परंतु तिचे समाधान होईना. तिचा पहिला प्रश्न होता, "माणसानं कशाप्रमाणे जगावं ?" कोणी उत्तरे देत, कुत्र्या-प्रमाणे. कोणी म्हणत कोळशाप्रमाणे. कोणी म्हणत मेणबत्ती-प्रमाणे ! दुसरा प्रश्न ती विचारी, "अत्यंत नम्रपणे व जास्तीत जास्त सेवा कोण करतो ?" कोणी उत्तर देत परिचारिका. कोणी म्हणत गुलाम ! मग राजकन्या तिसरा प्रश्न विचारी. "ज्यांच्या-वाचून जीवन अशक्य आहे असे असं काय आहे ?" लोक उत्तर देत, प्रेम, पैसा, आई इत्यादि. तिचा चौथा प्रश्न असे, "अत्यंत दुष्ट प्राणी कोणता ?" उत्तर द्यायला येणारे पटकन म्हणत. साप, वाघ ! मग राजकन्या सरतेशेवटचा प्रश्न विचारी. 'जगात अत्यंत चांगला, सौजन्य असलेला प्राणी कोणता ? या पाचव्याचे उत्तर येई, साधुसंत, गाय, घोडा, शेळी !

आणि ही असली उत्तरे ऐकून राजकन्येचे मुळीच समाधान होईना. याचे कारण तिच्या मनातली उत्तरे अधिक विचारपूर्वक जुळलेली होती. शेवटी एक दिवस खरोखरीच एक अत्यंत दरिद्री तरुण त्या राजमहालात आला. चेहरा खूप मळकटलेला, दाढी वाढलेली असे ध्यान होते त्याचे. अंगावरचे कपडे खूपच फाटलेले नि मातीने मळलेले होते. त्याच्या हातात एक कमंडलू, एक वाडगा नि एक सोटा होता. इतका भिकारी दिसणारा माणूस आजपर्यंत कोणीच आला नव्हता. राजाने मनात म्हटले, "याही माणसाला नीट उत्तरे देता आली नाहीत तर फार बरं होईल. अशा माणसाशी का माझ्या मुलीचं लग्न लावून देऊ !"

तितक्यात राजकन्या आपल्या नीटनेटक्या पोशाखात राजाच्या शेजारी येऊन बसली. तिने त्या पाहुण्याला एका बैठकीवर बसायला सांगितले. राजकन्येने त्या पाहुण्याला पाणी, फराळ काही हवे असल्यास विचारले. त्याला अल्पोपहार दिल्यावर तिने विचारले,

"आपण कुठून आलात ?"

"मी हिमालयाकडून आलो आहे. गेली काही वर्षे खूप फिरलो." भिकारी म्हणाला.

"आपला उद्योगधंदा ? आपण मूळचे कोण ?" राजकन्येने विचारले.

"उद्योगधंदा ?......मी एक साधासुधा भिकारी आहे. गाता येतं मला. गाऊन पोटापुरती भीक मागणं हा माझा धंदा. माझं कोणीच नाही. वाटलं, एकाच गावात भीक मागण्यापेक्षा ठिक=

ठिकाणी जावं. फिरत फिरत फक्त पोटापुरतीच भीक मागावी... प्रवासानं लोकांचा स्वभाव समजेल, अनुभव मिळेल, काही नवीन पाहायला मिळेल, नवीन शिकायला मिळेल. थोडं ज्ञान मिळेल."

राजकन्येने विचारले, "भीक मागण्यापेक्षा कामधंदा करून तुम्हांला आपली उन्नती करून घ्यावीशी नाही वाटली? तुम्हांला गाता येतं, गायनशाळा काढता आली असती......"

"मला पैसे कमवायचे नव्हते. भिकारी राहून लोकांचा स्वभाव पाहायचा होता. माझ्या भिकारीपणात मला जो अनुभव मिळाला, जे ज्ञान मिळालं, ते मला माझ्या गायनशाळेत मिळालं नसतं. माझ्या भिकारीपणाचा मला अभिमान वाटतो...बरं पण, आपले प्रश्न काय ? अमुकच माणसानं त्यांची उत्तरं द्यायची अशी अट होती काय त्याला ?..." भिकाऱ्याने विचारले.

राजकन्या ओशाळत म्हणाली, "छे ! छे, मी सहज चौकशी केली तुमची. माझे पाच प्रश्न आहेत हे कळलंच असेल तुम्हाला. पहिला प्रश्न असा की, माणसानं कशाप्रमाणं जगावं ?"

भिकाऱ्याने चटकन उत्तर दिले, "चंदनाप्रमाणं ! कारण असं, चंदन जंगलांत वाढतं ... जिथं कौतुक नाही, स्तुती नाही, उलट विषारी सर्प आहेत अशा ठिकाणी ! गरीबापासून तो श्रीमंतांपर्यंत ते पोहोचू शकतं, त्यांना शांती, गारवा देऊ शकतं. मंगल टिळा देऊन उल्हास देऊं शकतं, सुगंध देतं, औषधी म्हणून उपयोगी पडतं. कारागिरांच्या कलेसाठी स्वत:वर आघात करून घेतं, पण त्यात त्याला खेद नाही, खंत नाही ...... आणि अखेर... थोर लोकांच्या जीवन-समाप्तीच्या पवित्र वेळी स्वतःच्या देहाची

चिताही रचतं ते ! –स्वतःची राख करून घेण्यात धन्य मानतं ते. स्वतःला......"

राजा व राजकन्या चकित झाले या उत्तराने. राजकन्येने दुसरा प्रश्न विचारला. "अत्यंत नम्रपणे जास्तीत जास्त सेवा कोण करतं ?" पाहुण्याने लगेच उत्तर दिले, "रस्ता. दुसऱ्यांच्या लाथा सोसूनही त्यांची सेवाच करीत राहणं याहून अधिक नम्र सेवा कोणती ? राजापासून रंकापर्यंत सर्व लोक, जनावरं, प्रत्येक चलवस्तू, सगळे रस्त्याचा वापर करतात. रात्र, दिवस, बाराही महिने हे चालू असते. ऊन, पाऊस, थंडी, वारा सगळ्यांचे आघात सोसत सोसतच रस्त्याची अखंड सेवा चालू असते..."

राजाने खूश होत एकदम टाळी वाजवली. तो उद्‌गारला, "वा ! वा ! शाबास ! आपल्याला एकदम पटलं तुमचं बोलणं. आता पुढचा प्रश्न सोडवा."

राजकन्येने तिसरा प्रश्न विचारला, "ज्याच्यावाचून, विशेषतः माणसाचं जीवन अशक्य आहे असं काय ?"

पाहुणा म्हणाला, "हवा ! एकवेळ माणसाला पाण्याशिवाय राहता येईल; पण हवाच नसली तर ? ...... नाक-तोंड दाबून श्वासाची हवाच बंद केली तर ?... अशक्यच आहे जीवन."

राजकन्या म्हणाली, "पटतंय मला तुमचं उत्तर. आता चौथा प्रश्न. सर्वांत दुष्ट प्राणी कोणता ?"

भिकारी म्हणाला, "अत्यंत दुष्ट प्राणी–दुष्टात दुष्ट माणूसच असू शकतो...होय नं ? राजेसाहेब बरोबर आहे नं ? जनावरं आपल्या जिवाच्या भीतीनं दुष्टपणा करतात. किंवा पोट भरण्या-

साठी दुसऱ्याचा बळी घेतात, पण माणूस केवळ स्वार्थासाठी किंवा सूड म्हणून किंवा आसुरी आनंद म्हणून इतरांचे बळी घेतो...इतर माणसांचं जीवित अत्यंत क्रूरपणे पार विध्वंसित करतो. दया आणि विचार या दोन देणग्या माणसाला निसर्गानं खास दिल्या आहेत, पण माणूस त्यांचा योग्य वापर जाणूनबुजून करीत नाही."

राजा आवेशाने म्हणाला, "खरोखर ! अगदी बरोबर आहे." राजकन्येच्या मनात प्रश्न उभा राहिला, "आता उरला एकच प्रश्न. या भिकारी माणसानं त्याचंही उत्तर जर बरोबर दिलं तर ? खरोखरीच भिकाऱ्याशीच लग्न करावं लागणार ! भयंकर गोष्ट. पण आपलं वचन तर पाळायलाच हवं. एक गोष्ट खरी की, हा मनुष्य खूप हुशार वाटतो. आजपर्यंतच्या शिकल्यासवरल्या राजपुत्रांनाही जी उत्तरं देता आली नाहीत, ती यानं किती सुरेख सांगितली ! "

याच वेळी राजा मनात म्हणाला, हा माणूस खरोखरीच फार हुशार दिसतो......पण आहे भिकारी ! याला घरजावईच करावा लागणार ...... दुसरा उपायच नाही......" इतक्यात पाहुणा म्हणाला, " हं. आता एकच प्रश्न राहिला नं. ? त्यावरच माझी पूर्ण परीक्षा अवलंबून आहे ......"

राजकन्येने पाचवा प्रश्न विचारला, " अत्यंत चांगला प्राणी कोणता ?......सौजन्य कोणात आढळतं ? "

पाहुणा म्हणाला, " तो प्राणी देखील माणूसच. सौजन्यपूर्ण माणसांखेरीज हे जग एवढं सुंदर झालंच नसतं. आपण एकमेकांशी सरळ वागतो, एकमेकांवर अलोट प्रेम करतो. वेळी दुसऱ्यासाठी प्राणही अर्पण करतो. सत्यासाठी, न्यायासाठी प्राणपणानं लढतो !

ही दिव्य मूल्यं—माणुसकी, त्याग, आत्मबलिदान या गोष्टी माणसा-नंच तयार केल्या. सर्वांत श्रेष्ठ तर माणूसच आहे."

राजकन्या नम्रपणाने म्हणाली, "तुमची पाचही उत्तरं सुंदर आहेत. सत्य आहेत." परंतु हे ऐकून राजाला पटकन वाईट वाटले. तो म्हणाला, "माझी मुलगी वैभवात वाढली, लाडाकोडात वाढली. तुमच्यासारख्याशी ती कसा संसार करील? तुम्ही लग्नानंतर आमच्याचकडे राहावं एवढी विनंती आहे माझी."

भिकारी म्हणाला, "हिमालयापर्यन्त प्रवास करून आलेला· गरिबीचं दुःख अनुभवलेला मी! राजमहालात राहणं जमणारच नाही मला. आपला शब्द आपण पाळणार नसल्यास मी जाऊ शकतो."

राजकन्येने निश्चितपणे राजाला सांगितले की, तिचा शब्द पाळणे तिला भागच होते. राजाने दुसरे दिवशी भिकाऱ्याच्या इच्छेप्रमाणे अत्यंत साध्या समारंभात राजकन्येचे लग्न केले. भिकाऱ्याच्या सांगण्याप्रमाणे अतिशय साध्या दोन साड्यांचे एक चिमुकले गाठोडे घेऊन राजकन्या त्या भिकाऱ्याबरोबर निघाली. भर उन्हात, पाय पोळत, रात्रीच्या थंडीवाऱ्यात, कुठेतरी आसरा घेत, गप्पा मारत, गातगात सात दिवस प्रवास केला त्यांनी. आठवे दिवस एका गावी आले ते. तिथे अतिशय नीटनेटकी छोटी छोटी घरे होती. पलीकडे शेते डुलत होती. मळे फुललेले होते. भिकाऱ्याला पाहून अकरा सुवासिनी आरती घेऊन पुढे आल्या. त्यांनी मोठ्या अदबीने भिकाऱ्याला व राजकन्येला ओवाळले. राजकन्येला त्या एका घरात घेऊन गेल्या. त्यांनी तिला उंची वस्त्रे दिली. सुंदर पण मोजकेच दागिने दिले. काही वेळाने भिकारीही

नीटनेटका पोशाख करून तिथे आला. आता तो राजबिंडा दिसत होता. तो राजकन्येला सांगत होता.

" मीही एक राजपुत्र आहे. सोळा वर्षांचा असताना वडिलांच्या परवानगीने प्रवासाला निघालो. पाच वर्षं खूप फिरलो. शिक्षण-संस्था पाहिल्या. गुरूजवळ अभ्यास केला. बाजारपेठा पाहिल्या. लोकांचे स्वभाव पाहिले, साधुसंत पाहिले. घरी परतल्यावर श्रीमंती –गरीबी नष्ट करायचे ठरवले. हे आमच्याच राज्यातले शेतकरी. आता जेवण उरकून आपण आपल्या राजधानीत जाऊ." राजकन्या चकितच झाली ते ऐकून. दोघेही राजधानीच्या गावी गेले.

राजपुत्राच्या राजधानीत साधीच पण कलात्मक नि रेखीव छोटी घरें होती. अत्यंत स्वच्छ ! रस्त्यावर दुतर्फा उंच डेरेदार वृक्षांची सावली होती. सुरेख बगीचे नि तलाव होते. कामधंद्याच्या, शिक्षणाच्या प्रशस्त इमारती होत्या. लोक आनंदी दिसत होते. राजधानीचे रेखीव गाव पाहून राजकन्या दिपून गेली. लग्नासाठी 'पण' केल्याबद्दल तिला धन्य वाटत होते. एका सुरेखशा टुमदार इमारतीच्या फाटकाशी राजा–राणी व दरबारी लोक आपल्या राजपुत्राची व सुनेची वाट पाहत थांबले होते.

□ □ □

## ६ : चार शिकारी

घनदाट अरण्य. संध्याकाळची वेळ. त्यातही भर हिवाळा !

गारठा खूपच पडला होता. चार शिकारी आपले घोडे दौडवीत सैराट धावत होते. झाडीझाडीतून फिरत होते. त्या अरण्यातून बाहेर पडायला वाट शोधत होते.

चौघेही शिकारी निधड्या छातीचे वीर होते. उत्तम लढवय्ये होते. अंगावर सैनिकी पोशाख तसाच होता. काही मैलांवरच अरण्याच्या तोंडाशी त्यांची फौजी वसाहत होती.

तिथून हे शिकारी इथे शिकारीला आले होते. त्यांच्यातले तिघे तिशीच्याजवळ असावेत. चौथा तर पंचविशीतलाच वाटत होता. राजबिंडा देखणा तरुण. चेहऱ्यावरचा भाव नीडर नि करारी होता. इतर तिघांचा तो नायक होता.

काही केल्या वाट सापडेना. ती शोधत चौघेही एका टेकडीशी आले. टेकडीच्या पायथ्याशी बरीचशी मोकळी जागा होती. त्या जागेत एक प्रशस्त झोपडी होती.

नायक जोडीदारांना म्हणाला, "वाट तर सापडत नाही. काळोख होतोय. जराशानं सगळं अंधारेल. गारठा तर मी म्हणतोय. जमलं तर रात्री या झोपडीतच मुक्काम करू. रिकामी असली तर बरंच, कोणी राहत असलं तर रात्रीपुरता निवारा मागू..."

चौघेही घोडे वळवून झोपडीशी गेले. नायकाने हळूच दार वाजवले. एका मध्यमवयीन गृहस्थाने दार उघडले. हातातला मिणमिणता दिवा वर धरीत विचारले, “कोण तुम्ही ?... काय हवंय ?”

नायक म्हणाला, “माझं नाव शत्रुंजय. आमच्या फौजी तळावरून आम्ही या अरण्यात आलो होतो. शिकार करणार होतो. शिकार तर नाहीच, पण वाट मात्र चुकलो. इथं रात्री पुरता आसरा मिळाला तर...”

तो गृहस्थ दारातून बाजूला होत म्हणाला, “जरूर !... या या !... माझं नाव कालेश्वर. माझंच घर आहे. बेलाशक राहा... थंडी फारच आहे.”

चौघेही झोपडीत गेले. पुढची खोली मोठी होती. बैठकीची जागा ती. मागची खोली म्हणजे स्वैपाकघर. कालेश्वराने पुढच्या खोलीत बैठक अंथरली. वाघाची दोन-तीन कातडी एकत्र जोडलेली बैठक ! बैठकी शेजारी मातीची शेकोटी होती. कालेश्वर म्हणाला, “बसा बैठकीवर. पाणी आणतो प्यायला, हातपाय धुवायला. मग विश्रांती घ्या... थोड्या वेळानं जेवू...”

शत्रुंजय म्हणाला, “कसं जेवणार ? जवळ ना शिदोरी ना शिकार !... निष्कारणच दिवस फुकट गेला...”

कालेश्वर म्हणाला, “आम्ही घालू की जेवायला. आम्ही नि ही पोरं जेवायचीच आहेत. माझी मुलगी नि मी आता चटकन भाकरी करू...”

तितक्यात खोलीच्या एका कोपऱ्यातून एका मांजराने फिस्कारून ‘म्याँ ऽ ऽ व’ केले. कसला धिप्पाड, आडदांड रानबोका !

हिरवेगार खुनशी त्याचे डोळे ! तेवढ्यात दुसऱ्या कोपऱ्यातून एक अस्वल 'हाँऽऽ ऊंऽऽ' ओरडले. अस्वलाचे एक लठ्ठगुठ्ठ पिलू होते ते. कालेश्वराने म्हटलेली हीच ती दोन पोरे !

याच वेळी स्वैपाक घरातून एक सुंदर तरुण मुलगी तिथे आली. पाणी आणले होते तिने. कालेश्वर म्हणाला, "ही माझी मुलगी यौवना .." जेमतेम बावीस तेवीस वर्षांची असावी ती. ती कालेश्वराला म्हणाली, "चटकन भाकरी करून टाकू. सकाळचं तोंडी लावणं आहेच."

कालेश्वर आणि यौवनेने भाकरी केल्या. बाहेरच्या खोलीत पाने वाढली. पाहुणे हातपाय धुवून पानावर बसले.

तोच त्या अस्वलाच्या पिलानें चौघाही शिकाऱ्यांवर अचानक उडी टाकली ! 'हाँ ऽऽऽ ऊँ'' करून ओरडत चौघानाही लोळवले. आपल्या तीक्ष्ण नखांनी नि जीवघेण्या गुदगुल्यांनी बेजार केले त्यांना...

अस्वलाचा हा पिसाटवाणा हल्ला होताच कालेश्वर त्या रानबोक्यावर ओरडला, "पाहत काय राहिलास ?... पकड अस्वलाला आधी... घेऊन जा तिथून..."

रानबोक्याने भयानक ओरडत अस्वलावर उडी घेतली. त्याच्या नाकाला कडकडून चावला तो. रानबोक्याने अस्वलाला रेटीत त्याच्या कोपऱ्यात ढकलून दिले.

अस्वल नाक चोळीत गुपचूप बसले तिथे. रानबोकाही आपल्या जागी गुरगुरत होता. यौवनेने अस्ताव्यस्त झालेली पाने पुन्हा नीट केली. पाहुण्यांना पाणी प्यायला दिले.

कालेश्वर म्हणाला, "जरा आपण बेसावध राहिलो की हे

अस्वल असंच करतं. फक्त हा रानबोकाच आवरू शकतो त्याला. क्षमा करा या हल्ल्याबद्दल. शांतपणे जेवा पाहू... "

पण चौघेही पाहुणे जेवण्याच्या मनस्थितीत नव्हते. त्यांनी कसे बसे दोन घास खाल्ले एवढेच. कालेश्वर व यौवनाही त्यांच्या-बरोबर जेवले. रानबोका व अस्वलालाही जेवण देण्यात आले.

जेवण झाल्यावर कालेश्वर म्हणाला, "मंडळी, हे अस्वल म्हणजे या जगाचं प्रतीकच म्हणा ना..."

शत्रुंजयाचा एक जोडीदार आश्चर्यात म्हणाला, " म्हणजे ?"

कालेश्वर म्हणाला, " सांगतो. शत्रू आणि संकटं हेच या जगात मुख्य. अस्वल हे त्याचंच रूप. आपण जरा बेसावध असलो की शत्रू किंवा संकटं आपल्यावर हल्ला करतात. माणसांच्या रूपात, पेचप्रसंगाच्या रूपात, आजारांच्या रूपात, अपघातांच्या रूपांत हल्ला करतात. आपला बेसावधपणा खाडकन फेकून देऊन हा हल्ला तितक्याच जोरानं परतवला तरच आपला निभाव. आमचा हा रानबोका मग आपल्याला मदत करतो...मरणाच्या भीतीनं किंवा आपला शेवट होणार या भीतीनंच अस्वलानं माघार घेतली..."

शत्रुंजय एकदम म्हणाला, " रानबोका ?... म्हणजे हा एवढा भयंकर नि ताकदवान प्राणी खरा आहे तरी कोण ?"

कालेश्वर म्हणाला, ' मृत्यूऽऽ! ... किंवा संकटनिवारण किंवा शेवट कशाचाही–शत्रूचा किंवा संकटांचा शेवट ! मी तरी काय... कोटयवधी वर्षांपासून की केव्हापासून इथं आहे कोणास ठाऊक ?.. माझा जन्म मलाच ठाऊक नाही ...काहीजण ' काळाचा प्रवाह ' म्हणतात मला !"

चौघेही पाहुणे डोळे विस्फारून पाहतच राहिले कालेश्वराकडे. मग कालेश्वर एवढेच म्हणाला, "मंडळी, झोपा आता. उशीर बराच झालाय..." पाहुणे सबंध रात्र अस्वस्थ होते. किती चमत्कारिक अनुभव !

सकाळ झाली. पाहुणे जायला निघाले. यौवना बाहेरच्या खोलीत होती. तिची हालचाल फार मोहक होती. शत्रुंजयाच्या मित्रांपैकी प्रत्येकाच्या मनात आले, "हिच्याशी आपलं लग्न झालं तर ..."

एकाने शेवटी तिला म्हटलेच, "शत्रूपुढे अजून एकदाही हार खाल्ली नाही मी...आयुष्यभर तुमच्यासारखीची साथ मिळाली तर सबंध जगाला आग लावून सोडीन..." यौवना त्याला थांबवीत म्हणाली, "सैनिक, आग विझवायची असते, लावायची नसते ! माझ्याबद्दल म्हणायचं तर मी यौवनाची, तारुण्याची देवता आहे. लग्न करून कोणाचा तरी संसार करीत बसण्यासाठी माझा जन्म नाही. प्रत्येक तरुणाला व तरुणीला जोम, कल्पना, उत्साह, आकांक्षा मी देते. तुलाही दिलं हे. शत्रूला ठार करण्यापलीकडे माझ्या या मदतीचा काय उपयोग केलास ? किती संकटग्रस्तांची सेवा केलीस ? ..लोककल्याणासाठी काय केलंस... आता वेळ गेली आहे..."

शत्रुंजय स्वस्थ उभा होता. यौवना त्याला म्हणाली, "तुझ्या पाठीशी मात्र शक्य तितकं राहायचं म्हणतेय...अर्थात हितचिंतक म्हणून...तुझ्या लहान वयात तू लढाया तर जिकल्यासच...शिवाय आणखीही काही केलंस ! शत्रूच्या जखमी सैनिकांनासुद्धा शक्य ती मदत केलीस. तुझ्या लोकांना अनेक संकटातून सोडवलंस,

अनेक दुखणाइतांसाठी रात्रंदिवस श्रमलास... मला ठाऊक आहे सगळं... ”

शत्रुंजय म्हणाला, “पण तू तर तारुण्याची देवता... तू माझ्या पाठीशी कितीशी राहाणार...आणि किती काळ ?...”

यौवना म्हणाली...“ तेच सांगतेय. चिरयौवन–चिरतारुण्य हा माझा स्वभाव... तुझ्यासारख्यांना जास्तीत जास्त मदत करीत असते मी... तुझ्या कपाळाला नि बाहूंना मी स्पर्श करते बघ. यामुळे तू शरीरानं म्हातारा झालास तरी मनानं तरुण राहशील ! उत्साहाची, नव्या कल्पनांची झळाली सतत असेल तुझ्या चेहऱ्यावर... तेजःपुंज चेहरा ! बाहूत सामर्थ्य असेल. लोककल्याणाची अनेक कामं करता येतील तुला... आणि तुझं आजचं तरुण मन ?... तुझं मन चिरयौवनानं प्रभावित...मृत्यूपर्यंत तरुणच राहील... सुन्दर कल्पनांनी, उदात्त विचारांनी भरून गेलेलं, उत्साहानं ओसंडत असलेलं... असंच राहील तेच अखंड !”

□ □ □

## ७. वर–दान

शंकर आणि पार्वती एकदा एका नदीकाठी फिरत होते. आजूबाजूचा प्रदेश फारच रम्य होता. हिरवागार. नदीच्या घाटावर जललहरींची मजा पाहत दोघेही बसले थोडावेळ.

इतक्यात शंकराच्या कानी दुरून शब्द आले, " ॐ नमः शिवाय–ॐ नमः शिवाय... " शंकर पार्वतीला म्हणाले, " ते पाहा पलीकडे कोणीतरी ध्यानस्थ बसलंय...आणि त्याच्याही पलीकडे आणखी एक कोणी..."

शंकर-पार्वती हलक्या पावलांनी तिथे गेले. ध्यानस्थ माणूस ध्यानात मग्न होता–निश्चल ! तोंडाने जप चालला होता " ॐ नमः शिवाय... " समोर वाळूत त्याने एक छोटेसे शिवलिंगही तयार केले होते.

शंकर-पार्वती तिथून पुढच्या माणसाकडे गेले. हा ध्यानस्थ माणूसही ध्यानात मग्न होता–निश्चल ! तोंडाने जप चालला होता " ॐ नमः शिवाय..."

पार्वती शंकराला म्हणाली, " देवा, किती आराधना करायला लावणार यांना ? ऊन कसं रणरणत असेल दुपारी... वाळूही तापत असेल... कसं होत असेल बिचाऱ्यांना..."

शंकर म्हणाले, " मग तुमचं म्हणणं तरी काय देवी ?... त्यांची समाधी मोडून टाकू ?"

पार्वती म्हणाली, " तसं कसं म्हणेन मी ? पण आपण इथं आलोच आहोत तर तुम्ही त्यांना दर्शन देऊन टाका... त्यांना जे हवं असेल तें देण्यासारखं असलं तर देऊन टाका. "

शंकर खरोखरीच दोघांच्या मधे उभे राहिले. म्हणाले, " वत्सांनो...जागे व्हा. मी शंकर आलोय..."

दोन्ही भक्तांनी डोळे उघडले. साक्षात शंकराचे दर्शन घडले त्यांना. डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले. शंकर-पार्वतीपुढे अत्यंत नम्रपणे उभे राहिले ते हात जोडून.

शंकर म्हणाले, " कोण तुम्ही ?"

दोघांपैकी एक म्हणाला, " देवाधिदेवा, मी एक गरीब सावकार आहे. आपली कृपा मिळवण्यासाठी आपली आराधना करीत होतो. "

दुसरा म्हणाला, " देवा, मी एक गरीब शेतकरी आहे. आपलं दर्शन व्हावं म्हणून आपलं ध्यान करीत होतो. "

शंकर म्हणाले, " तुम्हां दोघांचीही माझ्यावरची भक्ती पाहून मी संतुष्ट झालोय. काय वर देऊ मी तुम्हाला ?"

सावकार म्हणाला, " देवा, मला पुष्कळ धन मिळावं अशी माझी इच्छा आहे... "

शंकर म्हणाले, " तथास्तु... "

शेतकरी म्हणाला, " देवा माझ्या शेतात पुष्कळ मेहनत करायला माझ्या हातात खूप बळ यावं अशी माझी इच्छा आहे. "

शंकर म्हणाले, " तथास्तु... "

दोघेही भक्त शंकराला वंदन करून निघून गेले. पार्वती शंकराला म्हणाली, " छान न्याय आहे तुमचा ! वा–वा ! तो

सावकार दिवसभर श्रीमंतीत लोळत राहणार आणि हा शेतकरी दिवसभर शेतात राबत राहणार ! "

शंकर म्हणाले, " देवी, पण त्यांनीच मागितले ते वर... "

पार्वती म्हणाली, " सावकार वस्ताद होता. शेतकरी भोळा-भाबडा ! "

शंकर पार्वतीकडे पाहून हसले. म्हणाले, " देवी, माझ्या मते सावकारापेक्षा शेतकरी जास्त विचारी आहे, आणखी दोन वर्षं थांबू या... माझे वर ते कसे वापरतात ते दिसेलच. "

सावकार व शेतकरी मोठ्या उत्साहात घरी गेले.

सावकाराने आपल्या पेढीवरची बैठक साफसूफ केली. तिजोरी स्वच्छ केली. तिला ताजा हार घातला. घराला रंग सफेती केली. जिथे तिथे भिंतीवर कुंकवाने स्वस्तिके काढली. लक्ष्मीचे फोटो लावले.

शेतकऱ्याने कणगी साफसूफ केली. कोठाराची खोली झाडली. जमिनी सारवल्या. बियाणे साफ करून नीट भरून ठेवले. नांगर साफ केला. बैलांची मशागत केली. दाराला तोरण बांधले. अंगणात रांगोळी घातली वृंदावना पाशी.

सावकाराकडे अनेक शेतकरी नि इतर गरजवंत येत. कर्जाऊ पैसे नेत. व्याजाचे पैसे देत. दागदागिना गहाण ठेवीत. घर, शेत गहाण ठेवीत. सावकाराची तिजोरी भरत चालली. तो खुशीत होता.

गाणी गात गात शेतकरी शेत नांगरी. माथ्यावरचे ऊन आनंदात सोसी. हिरव्या भरगच्च शेताची स्वप्ने त्याच्या डोळ्यांपुढे नाचायची. धान्याच्या राशी डोळ्यांपुढे तरळायच्या. तोही खुशीत होता.

पावसाच्या सरी आल्या. भूमी आई सुखावली, शेतकऱ्याने पेरण्या केल्या. काही दिवसांनी रोपे आली. पुढे रोपे बाजली. हिरवे गार शेत वाऱ्याच्या झुळकीवर डुलू लागले. ऊन, पाऊस डोक्यावर झेलत शेतकरी खपत होता. कंबर वाकवून तण काढत होता. घरातल्या सगळ्या बायकापोरांना राबवत होता. बैलांना गोंजारत होता. शेत पिकले. दसपट धान्य मिळाले. खळ्यावर राशी लागल्या. कणगी भरल्या. धान्याचा कस पाहून दाम दुपटीने धान्य विकले गेले. पुष्कळच पैसा मिळाला. शेतकऱ्याने नवी शेते घेतली. लेकाचे लग्न केले. संसाराला, शेतात राबायला दोन नवे हात आले.

सावकाराच्या धंद्याचा जम छान बसला. गोरगरीबांची कर्जासाठी गर्दी होई. सावकाराने व्यापारात पैसा गुंतवायचे ठरवले. व्याजाचा दर पण वाढवला. त्याला खूप पैसा मिळू लागला. स्वतः सगळा व्यवहार पाहायचे सावकाराला जमेना. मेहनत करण्याचा मुळातच कंटाळा. हाताखाली नोकर-चाकर आले. दिवाणजी आले. मुनीमजी आले. सावकार मित्रमंडळी जमवी. करमणुकीसाठी मैफिली, जलसे होत. खाणेपिणे, ऐषआराम यांची रेलचेल झाली. सगळा व्यापार दिवाणजी नि मुनीमजी पाहू लागले.

एक दिवस आभाळाकडे पाहात सावकार म्हणाला,

" शंकरदेवा, तुझा वर फुकट नाही घालवला मी. केवढा पैसा मिळवला बघ ! "

तेव्हाच आभाळाकडे पाहात शेतकरी म्हणत होता, " शंकरदेवा, तुझे उपकार कसे रे फेडू ?... तू तर सोनं पिकवलंस माझ्या शेतात ! "

वर्ष केव्हाच उलटून गेले. एक दिवस पार्वती शंकराला म्हणाली, " आपण गेल्या वर्षी त्या दोन भक्तांना वर दिले होते. त्यांच्या गावी जाऊन पाहू या का त्या दोघांचं कसं चाललंय ते ! "

शंकरांनी गरीब शेतकऱ्याचा वेष घेतला. पार्वतीने शेतकरणीचा वेष घेतला. दोघेही सावकाराकडे आले. वाड्याच्या फाटकाशी पहारेकरी होता. शंकर पार्वती म्हणाले, " आम्ही गरीब शेतकरी आहोत. सावकाराला भेटायचंय..." पहारेकऱ्याने गुर्मीत उत्तर दिले, " शेटजी झोपलेत. काय पाहिजे तुम्हाला ?"

शंकर घुटमळत म्हणाले, " नाही म्हंजे...थोडं कर्ज हवं होतं. "

पहारेकऱ्याने विचारले, " दागिने आणलेत ?...एक दागिना मला बक्षीस दिला तर दिवाणजीची भेट करवीन. शेटजी तर भेटणारच नाहीत..."

पार्वतीने हातातली अंगठी द्यायला काढली. तितक्यात बाहेर जायला निघालेला सावकार स्वतःच फाटकाशी आला. त्याला व्यापारात फार मोठी खोट आली होती. त्याबाबतीत तो बाहेर जात होता. सावकाराने शंकर-पार्वतीला विचारले,

" काय पाहिजे ?... सकाळीच कशाला दाराशी ? "

शंकर म्हणाले, " मी गरीब शेतकरी आहे. गतसाली माझं सारं शेत किडीनं खाल्लं...कर्ज हवं थोडं..."

सावकाराने विचारले, " दागदागिना आणलाय ? चोख सोनं ?"

शंकर म्हणाले, " कुठून आणणार ?...पैसे पुढल्या वर्षी फेडून टाकू. "

सावकार खेकसला, " फार हुशार दिसतोस ! पैसे म्हणजे चिंचोके वाटले होय ? ...चल चालता हो इथून..."

शंकर नि पार्वती शेतकऱ्याकडे आले. त्यांनी शेतकऱ्याला पैसे मागितले.

शेतकरी म्हणाला, " या, या. थोडा पैका आहे शिल्लक, त्यातला घेऊन चला. अहो, गरज सर्वांनाच पडते. थोडं धान्य पण घेऊन चला ! शंकरदेवानंच दिलं हे सारं ! ... त्याचंच हे सगळं... माझं कुठलं ? काही अडलं तर पुन्हा या बरं !"

शेतकऱ्याने पाहुण्यांचे आतिथ्य केले. त्यांना संतुष्ट केले.

शेतकऱ्याकडून गेल्यावर पार्वती शंकराला म्हणाली, ' मी आधीच सावकार नि शेतकऱ्यातला फरक सांगितला होता... दिसला नं तो ? "

शंकर म्हणाले, " मलाही ठाऊक होता तो फरक. पण म्हणतात नं. ' देव देतो पण कर्म नेतं.' देवानं दिलेलं जपायचं की फेकायचं हे माणसाची कृतीच ठरवते."

पुढल्या वर्षापर्यंत तर सावकाराच्या चैनीची, आळसाची कमाल झाली होती. श्रीमंतीची भलतीच धुंदी चढली होती त्याला. तो स्वतः एकही व्यवहार पाहीना. दिवाणजी, मुनीमजी, नोकर-चाकर व तोंडपुज्या नातेवाईकांनी भरपूर पैसा खाल्ला. खोटे कागद-पत्र करून खूप पैसे लंपास केले. हळू हळू सावकाराचा व्यापार बुडला. धंदा बसला. त्याचे दिवाळे निघाले. आभाळाकडे पाहत तो एक दिवस म्हणाला, " शंकरदेवा, तू मला धन देणार होतास नं ? ... हे तर दिवाळं दिलंस. भिकारी केलंस मला !"... सावकाराच्या कानात कोणी गुणगुणले, " धन कष्टानं मिळतं. तू फक्त चैन केलीस."

या उलट, शेतकरी दुप्पट उत्साहात शेतात राबत होता, घाम गाळत होता. त्याने नवी शेते घेतली होती. त्यात पोराबाळांसुद्धा घरचे सगळे खपत होते. धान्याने कणग्या भरल्या. कोठारे भरली. शेतकरी तृप्त होता. त्याने गावाला भाईजेवण घातले. गरीब कर्ज बाजारी शेतकऱ्यांना धान्य वाटले. सर्व शेतकरी समाधानात होते.

शेतकरी आभाळाकडे पाहत एक दिवस म्हणाला, " शंकर-देवा, तू मला धान्य दिलंस, धन दिलंस... अंतरात्मा शांत केलास... बाहूत बळ दिलंस... तुझे उपकार कसे रे फेडू ?... "

शेतकऱ्याच्या कानात कोणी गुणगुणले, " तुझं धान्य नि धन तू स्वकष्टानं मिळवलंस... रात्रंदिवस राबलास... असाच राब... सुख पायाशी राहील तुझ्या. "

वर्षानंतर शंकर-पार्वती वेष पालटून पुन्हा आले गावात. त्यांनी काय पाहावे ?...

सावकार फाटक्या कपड्यात रस्त्यात अनवाणी भटकत होता ! शेतकरी आपल्या सर्व शक्तीनिशी हिरव्यागार शेतात राबत होता ! शंकर पार्वतीला म्हणाले, " देवी ! वर मिळवणं सोपं, पण पचवणं कठीण... आपण माणसांना पुष्कळ संधी देतो, पण त्यांचा योग्य उपयोग करायला माणसांनी स्वतःचीच बुद्धी वापरायला हवी खरं नं ? "

□ □ □

## ८ : रात्रगंधा

रात्रगंधेची फुले असतात तशी छोटी, पण त्यांचा गुंग करणारा छानदार वास कितीतरी दूरपर्यन्त घुमत राहतो. रात्रगंधेचा सुगंध इतका मोहक असतो की, आपण धुंद होतो त्यात. ही फुले संध्याकाळ होऊ लागली की, उमलतात म्हणून त्यांच्या झाडाला रात्री सुगंध देणारी किंवा रजनीगंधा हे नाव पडले. या झाडाला निशिगंध असेही म्हणतात. निशिगंध हे नाव किंवा गुलछडी हे नाव सर्वांनाच ठाऊक आहे.

या निशिगंधाचे म्हणजेच रात्रगंधेचे झाड पृथ्वीवर पहिल्यांदा कसे आले, त्याची एक मजेदार गोष्ट आहे.

एक अगदी छोटेसे खेडे होते. पण सुंदर होते. खेड्याच्या एका टोकाला एका पडक्यामोडक्या, छोटयाशा झोपडीत एक म्हातारा नि म्हातारी राहायची. त्यांना मुलगा की मुलगी कोणीच नव्हते. दोघेही आपले काम आपणच करायची. आपल्या शेतात दिवसभर खपायची नि जे थोडेफार उत्पन्न येईल, ते वर्षभर पुरवायची. समाधानात राहायची. त्यांची ती झोपडी खेड्याच्या टोकाला असल्यामुळे परगावचा एखादा वाटसरू विसाव्याला किंवा रात्रीच्या निवाऱ्याला क्वचित थांबे त्यांच्याकडे. म्हातारा–म्हातारी त्याची मोठ्या प्रेमाने, अगत्याने विचारपूस करीत आणि स्वतः अर्धपोटी राहून त्याला जेवायला घालीत.

या झोपडीच्या शेजारी, जरा अंतरावर इतर काही घरे व झोपडया होत्या आणि त्यांना लागूनच पुढे खेडयाची वस्ती होती. शेजारच्या घराच्या मालकाची शेती बरीच होती. श्रीमंत शेतकरी होता तो. शेती करायला त्याच्या घरात धट्टीकट्टी माणसेदेखील होती.

परन्तु त्या घरातली मुलं होती पक्की द्वाड ! पैशाची घमेंड होती त्यांना. ती मुले या म्हातारा-म्हातारीच्या नेहमी खोडया काढायची. त्यांना खडे मारायची, त्यांच्या झोपडीचे बांबू उपसून ठेवायची, कुडे मोडून ठेवायची, परसातल्या वेली नि रोपटी उपटून टाकायची– असा खूप त्रास दयायचे. बिचारे म्हातारा-म्हातारी न भांडता, न कुरकुरता सर्व काही पुन्हा दुरुस्त करीत बसायची, नव्या वेली, नवी रोपे लावायची ! त्यांच्या अंगणात केळी होत्या, पोपई होत्या, आंबा होता, चाफा होता. सुरेख सुगंधी फुलझाडे होती. दुधे, दोडकी, भेंडी असा भाजीपाला पण होता.

एकदा रात्रीची वेळ होती. म्हातारा-म्हातारी जेवण उरकून सहज बोलत बसली होती. परसातल्या भाजीच्या, तिथे येणाऱ्या रंगीबेरंगी पक्ष्यांच्या नि फुलपाखरांच्या विषयी गप्पा मारत होती दोघेही.

तेवढयात, जोरजोरात कुत्री भुंकू लागली. भुंकणे जास्त जवळ ऐकू येऊ लागले. म्हातारी चटकन म्हणाली, " कोणीतरी पर-गावचा वाटसरू इकडं येतोय वाटतं. शेजारच्या घरातल्या कुत्र्यां-चाच आवाज हा !"

म्हातारा म्हणाला, " पाहू का पुढं होऊन कोण आहे ते ? कुणी भुकेला–तहानेला असायचा एखादेवेळी ! कुत्र्यांपायी तर घाबरून गेला असेल ! "

म्हातारी म्हणाली, " तसंच असेल...... पाहा बरं.........
आपल्या शेजारच्या घराकडे गेला असेल कोणी वाटसरू, निवारा मागायला...... तिथल्या त्या द्वाड मुलांनी कुत्रे सोडले असतील बिचाऱ्यावर...... "

म्हाताऱ्याने हातात दिवा घेतला. झोपडीचे दार उघडून रस्त्यावर पाहिले. कुत्रे मागे लागलेले दोन नवखे वाटसरू भांबावून इकडे तिकडे आश्रय शोधत होते. म्हातारा चटकन त्यांना म्हणाला, " या या ! या नं ! ...... थांबा अंमळ आमच्याकडे...... विसावा घ्या जरा...... थकले-भागलेले दिसताय खूप...... या, या... "

ते दोन्ही वाटसरू दम छाटीत म्हणाले, " अहो, शेजारच्या घरातल्या मुलांनी तर हैराण केलं अगदी...... कहर केला त्यांनी ! खडे काय मारले, आमचे कपडे काय फाडले ! ......आरडाओरडा करून वर हे कुत्रे पिटाळले आम्हांला चावायला ! ...... "

म्हातारा-म्हातारीने क्षणातच दोघांना आपल्या झोपडीत घेऊन दार बंद करून घेतले. निवाऱ्यासाठी रात्रभर तिथेच राहायला सांगितले त्या पाहुण्यांना. प्यायला पाणी दिले. बसायला कांबळी दिली. म्हातारीने लगेच थोडे पीठ मळले. भाकरी टाकल्या चुलीवर. झुणका तयार केला चटपट. मग तिने चटणी, लोणचे, पापड, झुणका नि उनून भाकरी वाढल्या दोन थाळ्यात. पाहुण्यांना जेवायला बसायचा आग्रह केला.

पाहुणे पाय धुऊन जेवायला बसताच म्हातारी ओशाळून हात जोडत म्हणाली, " बरं का...... आम्ही फार फार गरीब आहोत. एवढंसं शेत पण ते देखील नीट लावून होत नाही आताशा...... ही कोरडी झुणका-भाकर गोड मानून घ्या...... काही कमी पडलं तर रागावू नका बरं...... "

पाहुणे तिला थांबवीत म्हणाले, " अहो, या आडवेळी, एवढया प्रमानं आश्रय दिलात ! लगबगीनं ताजं- ऊन अन्न पुढं वाढलंत... याहून जास्त काय हवं ? असं प्रेमळ आदरातिथ्य, असा प्रेमळ स्वभाव सगळीकडे कुठं मिळतो ? तुमच्या शेजाऱ्यांनीच आमचे कसे हाल केले तें पाहिलेत नं ? तुम्हां दोघांचे उपकार मानू तेवढे थोडेच...... "

जेवण उरकल्यावर म्हाताऱ्याने पाहुण्यांसाठी आपल्या गोधडया नि घोंगडया अंथरून अंथरुणे तयार केली. म्हातारा-म्हातारी दोघे स्वतः जमिनीवरच झोपली, एका कोपऱ्यात.

म्हातारी म्हाताऱ्याला हळूच म्हणाली, " बरं का ऽ ! हे पाहुणे मला तर वेगळेच वाटतात. साध्यासुध्या माणसांसारखे दिसत नाहीत ते. फार सज्जन नि मोठ्या घरचे वाटतात ते. तर...... "

इतक्यात त्या पाहुण्यांची कुजबुज त्यांच्या कानी पडली. पाहुणे एकमेकांना म्हणत होते, " बरं का ऽ ! ...... हे म्हातारा-म्हातारी वेगळेच वाटतात. साध्यासुध्या शेतकऱ्यांसारखे वाटत नाहीत. क्वचितच आढळतात अशी माणुसकीची माणसं. अतिशयच सज्जन नि सद्गुणी दिसतात दोघंही. दुसऱ्याबद्दल इतकी तळमळ असलेल्या या परोपकारी माणसांना काहीतरी उत्तम बक्षीस द्यायला हवं..."

—आणि हे शब्द संपतात तोच ! ...... म्हातारा-म्हातारीच्या डोळ्यांपुढे जशी लखखकन वीज चमकली ! डोळे दिपले त्या लखलखाटाने ! मग ती दोघे पाहतात तो त्यांचे पाहुणे अदृश्य झालेले ! त्यांच्याऐवजी पुढ्यात शंकरपार्वती उभे ! शंकर म्हणाले, " आम्ही दोघं वाटसरूंचा वेष घेऊन इथल्या लोकांची परीक्षा घ्यायला आलो होतो. तुमची माणुसकी, तुमचं अगत्य,

तुमचा प्रेमळपणा पाहून आम्ही प्रसन्न झालो आहोत. तुम्हांला हवा तो वर खुशाल मागा. मुळीच घाबरू नका."

म्हाताऱ्या-म्हातारीने पटदिशी शंकर-पार्वतीच्या पायांवर डोके टेकले. दोघेही म्हणाली," देवा, आम्ही तर आता म्हातारे झालो. आम्हाला कसलाही वर नको. आम्ही दोघांनी आयुष्यभर बरोबरच राहावं आणि बरोबरच मरावं, एवढीच आमची इच्छा उरलीय!"

पार्वती म्हणाली, "तुमच्यासारख्या सज्जन नि माणुसकीच्या माणसांनी या असल्या दुष्ट शेजाऱ्यांजवळ राहण्यात काय अर्थ? तुम्ही दोघंही आता तुम्ही म्हणता तसे पुष्कळच वृद्ध झाला आहात. तुम्हांला झाडांचं रूप देऊन अमर करतो आम्ही. हजारो वर्षं लोटली तरी तुमच्या कीर्तीचा आगळाच मोहक सुगंध सगळीकडे दूर दूर पसरत राहील..."

शंकर म्हणाले, "तुम्ही आम्हांला रात्री आश्रय दिलात. म्हणून तुमची सुकुमार फुलं पण रात्रीच उमलतील... बहरतील. तुमच्या निर्मळ मनासारखी तीसुद्धा निर्मळ पांढरी शुभ्र असतील. तुमच्या चिमुकल्या फुलांच्या अलौकिक सुगंधानं भानच हरपेल लोकांचं. रजनीगंधा किंवा रात्रगंधा हे निराळंच नाव देतो तुमच्या झाडांना. किंवा लोक निशिगंध म्हणूनही ओळखतील तुम्हांला."

क्षणात ती पडकी झोपडी नाहीशी झाली. त्या जागी दोन हिरवीगार नि भरदार मोठाली रोपे उभी राहिली. त्यांच्या फांद्या एकमेकांत दाट गुरफटल्या होत्या— अगदी एकमेकांचे हात घट्ट धरल्यासारख्या. त्या फांद्यांवर पाहता पाहता छोटीशी, चांदण्या तुताऱ्यासारखी, शुभ्र फुले उमलली– आकाशात चम-

चमत्या नाजूक, फुलाव्या तशी ! त्या नाजूक फुलांच्या अप्रतिम मोहक नि धुंदसु गंधाचा घमघमाट त्या खेड्यापलीकडच्या डोंगरांपर्यंत दरवळला थेट !


तसल्या रात्रीही लोक धावले सुगंधाच्या दिशेने. ते म्हणत होते, " एवढा सुगंध नि असला वेगळाच सुगंध कधीच माहीत नव्हता यापूर्वी ! स्वर्गात रजनीगंधा किंवा रात्रगंधा असते म्हणतात... तीच का असेल ही ? "

लोक लगबगीने आले रोपांपाशी. दोन्ही रोपांवरच्या फुलांच्या त्या अपूर्व सुगंधातून धुमणारे शब्द कानी पडले त्यांच्या. शब्द होते—

" या या. या नं ! ... थांबा अंमळ आमच्याकडे... विसावा घ्या जरा... थकलेले, भागलेले दिसताय खूप... या, या... "

□ □ □

# ९ : जास्त सुंदर कोण ?




फार फार पूर्वीची गोष्ट. कितीतरी हजार वर्षांपूर्वीची, परंतु मजेदार !

एकदा काय झाले की, भगवान विष्णू आपल्या दिवाणखान्यात जरा आराम करीत बसले होते. तितक्यात त्यांच्या दोन्ही पत्नी

तिथे आल्या. दोघींनी विष्णूंशी बऱ्याच गप्पा मारल्या. श्रीमंती, गरिबी, सौंदर्य अशा बऱ्याच विषयांवर बोलणें चालले होते, तितक्यात मध्येच लक्ष्मी म्हणाली,

" भगवन्, तसं आपण सौंदर्यावर बरंच बोललोय मघापासनं, पण आपल्या घरच्याच सौंदर्याबद्दल विचारायचंय मला आता....."

तेवढ्यात अकिंचना म्हणाली,

" माझ्याही मनात हाच विचार होता अगदी...हाच प्रश्न."

विष्णू म्हणाले, " दोघींच्या मनात एवढा घोळणारा घरच्याच सौंदर्याचा कोणता प्रश्न आहे हा ? सांगा तरी......"

लक्ष्मी व अकिंचना दोघी म्हणाल्या,

" आम्हांला काहीही सांगितलंत तरी आम्ही एमेककींवर मुळीच रागावणार नाही. पण असं सांगा की, आमच्या दोघींत जास्त सुंदर कोण आहे ?"

विष्णूंनी कपाळावर हात मारीत म्हटले, " जगातला कोणताही कठीण प्रश्न मी सोडवू शकेन; पण या प्रश्नाचं उत्तर मला मुळीच देता यायचं नाही !"

लक्ष्मी व अकिंचना दोघी म्हणाल्या, " हा प्रश्न एवढा अवघड वाटतोय ? तुम्हांला तर तो अतिशय सोपा वाटायला हवा. कारण तुम्ही रोज पाहता आम्हांला......"

विष्णू म्हणाले, " म्हणूनच प्रश्न आवघड ! रोज तुम्ही दोघीही मला इतक्या सुंदर वाटता की, जास्त सुंदर कोण हा निकाल देणं अगदी अशक्य आहे......"

लक्ष्मी म्हणाली, " भगवन्, हे तुमचं म्हणणं पटत नाही. आम्हीं भांडू असं वाटून तुम्ही हे सांगताय......"

अकिंचना म्हणाली, " आमच्या दोघीतला काहीतरी फरक लक्षात आलाच असणार तुमच्या...... उगाच उत्तर टाळण्यात काय अर्थ ?"

विष्णू म्हणाले, " माझ्याबद्दल तुम्हांला अशी शंका वाटत असेल तर उपाय सांगतो. एखाद्या नि:पक्षपातीं, निरपेक्ष व्यक्तीलाच हा प्रश्न विचारा ना तुम्ही. तिऱ्हाईत माणूसच तुम्हांला अगदी खरंखुरं उत्तर देईल."

दोघींनीं विचारले, ठीक आहे; पण तिऱ्हाईत व्यक्ती कोण सुचवता ? आम्ही जातो त्या व्यक्तीकडे......"

विष्णू म्हणाले, " सांगू अशी व्यक्ती ? कैलास पर्वताला आपलं घर समजणारे, एखाद्या साधूप्रमाणे राहणारे शिवशंकर तुमच्या प्रश्नाचं उत्तर देतील. अत्यंत नि:पक्षपातीपणानं देऊ शकतील. अगदी खरंखुरं सांगतील. तुम्ही भगवान शंकरांकडेच जा......"

लक्ष्मी व अकिंचना भगवान शंकरांकडे गेल्या. त्यांनी आपला प्रश्न त्यांना विचारताच शंकर म्हणाले, " मला छान छान कपडे, दागदागिने यांची आवड नाही. पार्वतीला पण ते आवडत नाहीत. आम्ही कसे दिसतो याचा आम्ही दोघेही कधी विचारच करीत नाही. जराही नाही. राजमहालात अनेक सुंदर सुंदर स्त्रिया वावरत असतात म्हणे. पण मला तर ? ......मला तर वाटतं हा हिमालय, हे सळसळते सर्प, हा लाडका नंदी याहून आणखी

सुंदर कोण असणार ? स्पष्ट बोलतो. सुंदर हा शब्द तुम्हां दोघींना लागू पडेल का? तेव्हा तुमच्या प्रश्नाचं उत्तर कसं देऊ? मला तुमच्या प्रश्नाचं उत्तर येत नाही......खरंच येत नाही !"

असल्या या विचित्र नि मुद्याबाहेरच्या उत्तराने लक्ष्मी व अकिंचना फारच निराश झाल्या. तरीही त्यांनी विचारले, " मग आमच्या प्रश्नाचं उत्तर आम्ही विचारायचं तरी कोणाला ? आमच्या दोघींत कोण जास्त सुंदर ते कोण सांगेल ?"

शंकर विचार करीत होते. थोड्या वेळाने ते म्हणाले, ब्रह्मदेवाला सबंध ब्रह्मांडाचं ज्ञान. सर्व शास्त्रांचा त्याचा अभ्यास. त्याला कदाचित् देता येईल तुमच्या प्रश्नाचं उत्तर. पाहा बुवा... आपल्याला तर त्यातलं काहींच समजत नाही . . ."

लक्ष्मी नि अकिंचना दोघीही आता हट्टाला पेटल्या होत्या. त्या लगेच आल्या ब्रह्मदेवाकडे. ब्रह्मदेवांनी त्यांचे बोलणे शांतपण ऐकून घेतले. बराच विचार करून ते म्हणाले, " मला सव गोष्टींचं ज्ञान आहे हे कबूल; परन्तु स्त्रियांच्या रुपसौंदर्यांचा मी खास असा अभ्यास केलेला नाही. सौंदर्यशास्त्राचं मला जे सर्व-सामान्य ज्ञान आहे त्यावरून मी सांगतो हवं तर प्रत्येक सौन्दर्य आपापल्या परीनं श्रेष्ठ आहे. शिवाय, मला जी वस्तू सुंदर वाटेल ती तुम्हांला वाटेलच असं कुठं सांगता येतंय ? कोणाला गोल चेहरा आवडतो, तर कोणाला उभट ! कोणाला सावळा रंग आवडतो, तर कोणाला पिठासारखा गोरा ! म्हणजे बरं का... सौंदर्याच्या कल्पना प्रत्येकाच्या निराळ्या असतात. तेव्हा तुमच्या प्रश्नाचं उत्तर कसं देणार ?

ब्रह्मदेवांचे हे लांबलचक व्याख्यान ऐकून दोघींना वाटले, उगाच आलो आपण इथे कोणीकडच्या कोणीकडे. भगवान शंकरांना स्वतः तर उत्तर देता आले नाहीच; पण कोणाकडे जायचे तेही सांगता येईना ! मोठ्या फणकाऱ्यात त्या ब्रह्मदेवाला म्हणाल्या, "अहो ऽ ऽ ! हे तुमचं सगळं पंडिती बोलणं झालं. आम्ही विचारतोय आमच्या दोघींबद्दल. दोन व्यक्तींपैकी जास्त सुंदर कोणती हे ओळखता येणारं कोणी सुचवा बघू ... दोन माणसातलं जास्त सुंदर कोण हे कारण देऊन पटवणारं आहे का कोणी ?"

ब्रह्मदेवांना एकदम आठवले. चुटकी वाजवीत ते म्हणाले, "आहे...आहे...निश्चित आहे ! ...एक अत्यंत अनुभवी व अतिशय चतुर व्यक्ती आहे पाहा...आता त्या व्यक्तीलाही आलं नाही तुमचं उत्तर तर बाकी कठीणच...पण पाहा हवं तर प्रयत्न करून..." दोघींनीही कंटाळत विचारले, "कुठं पाहायचा प्रयत्न करून ? ... कोण ही चतुर व्यक्ती ?"

"नारदमुनींच्याकडे जा तुम्ही. काय समजलात ! ते स्वर्ग, पृथ्वी, पाताळ सगळीकडे फिरत असतात. तीन्ही लोकांच्या आवडी–निवडीचा व कल्पनांचा पूर्ण अनुभव आहे त्यांना..."

लक्ष्मी व अकिंचना जरा आशेने म्हणाल्या, "हो, या अनुभवाचा होईल कदाचित् उपयोग...शिवाय, त्यांच्या डोक्यात नेहमी काहीतरी वेगवेगळेच विचार असतात ... जातो आम्ही त्यांच्याकडे."

दोघीही तडक नारदमुनींकडे आल्या. त्यांनी आपल्या येण्याचा

उद्देश सांगितला नारदमुनींना. ते म्हणाले, " तुमचा प्रश्न कठीण आहे. कारण दोघीही अत्यंत सुंदर आहात. क्रमांक लावणं बिकट. तरीपण मी असं पाहिलंय की, जे सौंदर्य एका प्रसंगी अत्यंत खुलतं तेंच दुसऱ्या प्रसंगी खुलत नाही ! म्हणूनच तुमच्यापैकी कोण, केव्हा जास्त सुंदर दिसते हे मी कदाचित् सांगू शकेन..."

दोघींना वाटले, काहीच न कळण्यापेक्षा निदान एवढे कळले तरी पुरे. पाहू या तरी नारदमुनी काय निकाल देतात तो.

नारदमुनी लक्ष्मीला म्हणाले, " हं, लक्ष्मीवैनी. मी सांगतो तसं करा. तुम्ही या माझ्या दिवाणखान्यातून उठून अंगणाच्या दारापर्यंत चालत जा आणि तिथून परत या." लक्ष्मी उठली. अंगणाच्या दारापर्यंत जाऊन पुन्हा दिवाणखान्यातल्या आपल्या बैठकीवर येऊन बसली. मग नारद म्हणाले, "आता अकिंचनावैनी, तुम्ही उठा. तुम्ही पण अंगणाच्या दारापर्यंत चालत जा आणि तिथून इथं परत या." अकिंचनाही उठली व अंगणाच्या दारापर्यंत जाऊन परत आली आपल्या बैठकीवर. तशी नारदमुनी एकदम टाळी वाजवीत म्हणाले, " सापडलं उत्तर ! ... अगदीच सोपं! ! "

लक्ष्मी व अकिंचना अधीरपणें नि आश्चर्याने नारदांकडे पाहू लागल्या. नारद म्हणाले. " लक्ष्मीवैनी, जेव्हा तुम्ही घरात प्रवेश करता तेव्हा तुम्ही अप्रतिम सुंदर दिसता. आणि अकिंचनावैनी, तुमचंही सौंदर्य काही कमी नाही. जेव्हा तुम्ही घरातून बाहेर जाता तेव्हा लक्ष्मीवैनीहून जास्त सुंदर वाटता. लक्ष्मीवैनी सामोऱ्या आल्या की अधिक सुंदर वाटतात आणि अकिंचनावैनी, तुम्ही पाठमोऱ्या झालात की अधिक सुंदर वाटता, बस ! शंकाच नाही ! "

आपल्या प्रश्नाचे योग्य उत्तर मिळाले या आनंदात दोघीही आपल्या घरी गेल्या. भगवान विष्णूंना ताबडतोब हा निकाल सांगायचा होता त्यांना.

त्या जाताच नारदमुनी स्वतःशीच म्हणत होते,

"खरंच लक्ष्मी (संपन्नता) घरात येताना, सामोरी होताना सुंदर वाटते; पण अकिंचना (दरिद्रता) घरातून निघून जाताना, पाठमोरी होताना सुंदर वाटते ! आणि दोघीही किती परस्पर विरोधी ! दोघीही एकाच वेळी, एकाच दारातून येतात-जातात! एक पाठमोरी होताच दुसरी सामोरी येते ! ... एक जाते त्याचक्षणी दुसरी येते ! !"

□ □ □

## १० : तुम्ही आवडता मिठासारखे.

एका राजाला सात राजकन्या होत्या. या सातही राजकन्यांवर राजाचे फार प्रेम होते. राजा शूर होता, भरपूर पैसेवाला होता; पण त्याला वाटे त्याच्यासारखा कर्तबगार नि हुशार तोच.

अनेकदा राजा आपल्या सातही राजकन्यांशी गप्पा मारत बसे. अशा वेळी मोठ्या सहाही राजकन्या राजाची नेहमी खूप खूप स्तुती करायच्या. त्याच्या प्रत्येक गोष्टीची तारीफ करायच्या. त्याने केलेल्या गोष्टी चूक असल्या तरी त्या बरोबर आहेत असेच म्हणायच्या. सर्वांत धाकटी मुलगी मात्र अशा वेळी गप्प असायची. तिला आपल्या बहिणींच्या वागण्यातला खोटेपणा मुळीच आवडेना.

एक दिवस नेहमी प्रमाणे राजा राजकन्यांशी गप्पा मारीत होता. राजाने मुलींना विचारले, "मुलींनो, मी तुम्हाला खरोखरच आवडतो?" मोठ्या सहाही मुली कलबलाट करीत एकदम ओरडल्या "अय्याऽऽ! हे असं कसं विचारता बाबा? कम्मालच! ... बाबाऽऽ! तुम्ही आम्हांला कित्ती कित्ती आवडता ते कसं सांगणार?"...

राजा त्यांना थांबवीत म्हणाला, "येईल की सांगता... नाही कसं? तुम्ही आजपर्यंत अनेक वस्तू खाल्या आहेत. त्यातल्या कोणत्या जास्त आवडत्या वस्तूंइतका आवडतो मी?"

थोरली म्हणाली " बाबा ऽ ! तुम्ही तर मला गुळासारखे आवडता ! "

दुसरी म्हणाली, " मला तर तुम्ही साखरेसारखे आवडता."

तिसरी म्हणाली, " मला नं ? ... मला तुम्ही अगदी गोड गोड मधासारखेच वाटता " ! ...

चौथी म्हणाली, " बाबा, मला किनई तुम्ही दुधासारखे आवडता... मला दूध फार फार आवडतं... नि हो ! दुधामुळेच तर लहान बाळं मोठी होऊ शकतात... ती त्यांची संजीवनीच ! "

राजा या उत्तरांनी खूपच खूष झाला होता. पाचव्या मुलीला त्याने विचारले, " तुला मी कशासारखा आवडतो सांग... "

पाचवी म्हणाली, " बाबा तेच सांगत होते मी ... मला नं? ... मला तर तुम्ही पक्वान्नांसारखे आवडता. तऱ्हतऱ्हेची पक्वान्नं मला बाई, फाऽऽर आवडतात. "

सहावी मधेच म्हणाली, " बाबा, मी सांगू मला तुम्ही कसे आवडता ते ?...... मला तर तुम्ही अमृतासारखे आवडता ! ... निदान सुधारसासारखे ! सुधा म्हणजेच अमृता एवढं मौल्यवान काहीच नाही ! "

राजा खुशीत म्हणाला, " वा वा ! कमालच केलीस तू तर ! "...... मग तो सगळ्यात धाकटीला म्हणाला, " आता राहिलीस तूच......शेवटची...... "

सर्वांत धाकटी शांतपणे म्हणाली, " बाबा, मला तुम्ही मिठासारखे आवडता ! "......

थोरल्या सहाही बहिणी एकदम ओरडल्या......" ईऽऽऽ !

.........म्हणजे खारट म्हणतेस तू बाबांना ?.........काही वाटतं तरी ? ......"

त्याच वेळी रागाने लाल होत राजा म्हणाला, " काय म्हणालीस ?......मिठासारखा ?...... मिठाचा खडा पडला की दूध नासतं......वाट लागते त्याची......पदार्थ खारट झाला तर तोंडात घालवत नाही !...... तसा आहे मी ?...... नीमक हराम !......"

धाकटी मुलगी म्हणाली, " बाबा, रागावणार असलात तर माझा नाइलाज आहे; परंतु मिठाची किंमत मला फार वेगळी वाटते......शिवाय, तुम्ही आत्ताच मला नीमकहराम म्हणालात... म्हणजे या दृष्टीनंही मिठाचं मोल फार मोठं......"

राजा तिचे बोलणे थांबवीत ओरडला, " तोंड बंद कर...... उगाच सारवासारवी करू नकोस...... कळलं तुझ्या मनात काय आहे ते......"

त्या दिवसापासून राजाने धाकट्या मुलीवर राग धरला. बिचारीला फार वाईट वाटे; पण उपयोग नव्हता. लवकरच राजाने थोरल्या सहाही राजकन्यांची खूप श्रीमंत नि सुस्वरूप मुलांशी धामधुमीत लग्ने लावून दिली. थाट तर खपच जंगी होता दर वेळी. राहिली सर्वांत धाकटी.

राजाच्या राजधानीत एक दिवस एक तरुण, रुबाबदार व्यापारी आला. त्याने राजाची भेट घेऊन आपल्या जवळचे गालिचे, उंची कापड वगैरे दाखवले. राजाला माल तर पसंत पडलाच, पण वाटले, " या तरुण नि सुस्वरूप कापडविक्याशीच आपल्या धाकट्या मुलीचे लग्न लावून टाकू. त्याच्या बरोबर ही ब्याद

जाईल एकदाची. मी मिठासारखा आवडतो काय !......ठीक आहे. राजगृहातली गोड गोड पक्कवान्नं सोडून सदा खारट पदार्थंच खा म्हणावं. तुझ्या दरिद्री नशीबात तेच असावं म्हणून हा कापडविक्या इथं आला. कोणास ठाऊक कुठला नि कोण तो !"......

राजाने व्यापाऱ्याला म्हटले, "तुमचा हा माल मला पसंत आहे. तुमची वागणूक तर इतकी आवडलीय की, तुम्हांला माझा जावईच करून घ्यायचं म्हणतोय मी......"

व्यापारी पाहतच राहिला राजाकडे. तितक्यात गालिचे नि उंची कापड पाहायच्या निमित्ताने राजाने आपल्या धाकट्या मुलीला बाहेर बोलावले. तिला आश्चर्यच वाटले. ती आली बाहेर. राजाने तिला विचारले, "हे गालिचे, ही कापडं कशी काय वाटतात तुला ?......" राजकन्येला फार आवडेल असेच होते ते सगळे. ती लगेच म्हणाली, "फारच छान माल आहे...." राजा म्हणाला, "......आणि हा व्यापारी तरुणही मला फार आवडलाय......त्याच्याशी मी उद्याच्या उद्या तुझं लग्न करून देणाराय......"

राजकन्या भेदरून उद्‌गारली, "लग्न ?...... उद्या ?......"

"होय, उद्याच...... म्हणजे ताबडतोब हा तरुण तुला आपल्याबरोबर त्याच्या घरी घेऊन जाईल......जा आता आत."

व्यापारी देखील आश्चर्याने राजाकडे नि राजकन्येकडे पाहतच राहिला—टकमका ! काय घडते आहे ते त्याच्या लक्षातच येईना. परंतु राजकन्या सुंदर नि अतिशय गोड होती दिसायला. व्यापाऱ्याला लग्नाला नकार द्यायचे कारणच नव्हते.

दुसऱ्याच दिवशी राजकन्येचे लग्न लागले. बिचारी एकसारखी रडत होती. पण मनांत हिंमतही बांधत होती, " राजाला तोंडपुज्या राजकन्या आवडल्या. प्रत्यक्ष पित्याला माझं खरंखुरं प्रेम ओळखता येऊ नये ?......ठीक आहे......येईल कधीतरी ओळखता."

राजकन्येला राजाने थोडेबहुत सामान बरोबर दिले. ती त्याचा निरोप घ्यायला गेली तेव्हा राजा म्हणाला, " मी मिठासारखा वाटलो नं तुला. म्हणून तुझे माझे संबंध गोड कधीच राहायचे नाहीत. समजलं. तुझ्या सर्व बहिणींची लग्न मी राजपुत्र किंवा प्रधानपुत्रांशी केली. तुझ्यासाठी मुद्दाम हा साधासुधा व्यापारी निवडला. आलं लक्षात ?"

राजकन्या पुढचे ऐकायला थांबलीच नाही. व्यापाऱ्यानेही राजाचा निरोप घेतला आणि राजकन्येला घेऊन तो निघाला.

व्यापारी राजकन्येशी फार चांगला वागत होता; पण त्याला हे कळेना की, राजाने आपल्या एवढ्या सुंदर राजकन्येचे एका साध्या व्यापाऱ्याशी असे घाईगर्दीत लग्न का करून द्यावे ! राजकन्येत काही दोष तर नाही ? की राजाला राजकन्येला काही कारणासाठी घरातून घालवून द्यायचे होते !

राजकन्या स्वतःच बोलू लागली होती नवऱ्याशी. दोघेही एका धर्मशाळेत विश्रांतीला थांबल्यावर ती म्हणाली, ' आपण आता एकमेकांच्या सुखदुःखाचे जन्मभर भागीदार राहणार आहोत. म्हणून माझ्या वडिलांनी एवढ्या घाईनं तुमच्याशी माझं लग्न का लावलं ते सांगते......तुम्ही कोण आहात, गरीब आहात की श्रीमंत आहात ते मला ठाऊक नाही; पण खरं बोलणं आणि

तोंडपुजेपणा न करणं या गोष्टीवर माझा विश्वास आहे. तुमचा संसार गरिबीचा असला तरी मी खरेपणानं करीन एवढं निश्चित सांगते......"

राजकन्येने व्यापाऱ्याला जे जे झाले ते सर्व सांगून टाकले. व्यापारी म्हणाला, "......तर मग ऐक. मीहीं एक राजपुत्र आहे. व्यापाराच्या निमित्ताने तऱ्हेतऱ्हेचे देश पाहायला निघालो होतो. आता सरळ आपण आपल्या राजधानीतच जाऊ. माझ्या आई-बाबांना म्हणजे राजाराणीला तुला पाहून फार फार आनंद होईल."

दोघांनाही एकमेकांशी लग्न झाल्याबद्दल अतिशय आनंद झाला. ते आपल्या राजधानीत सुखासमाधानात राहू लागले. दोन–तीन वर्षे निघून गेली.

राजाच्या थोरल्या सहाही मुली आता राजाकडे येतच नसत. त्या आपल्याच वैभवात गुंग होत्या. धाकटीने राजाला भेटण्याचा संबंधच नव्हता. अशातच एकदा एका राजाने या सात राज-कन्यांच्या राजावर स्वारी केली. एकाएकीं हल्ला आल्याने राजा गोंधळला. थोरल्या सहाही मुलींना मदतीसाठी निरोप धाडले. पत्रे लिहिली. त्यात तो त्यांना किती नि कशासारखा आवडायचा हेंही लिहिले; पण सहाही जणींनी आणि त्यांच्या नवऱ्यांनी उत्तरे पाठवली, " आम्ही मधे पडलो तर आमचे निष्कारण त्या हल्ला करणाऱ्या राजाशी वाकडे येईल ! म्हणून आम्ही काहीच मदत करू शकणार नाही."

वास्तविक सहाही जावयांनी मिळून, एकत्रित होऊन आपल्या सासऱ्याला मदत केली असती तर, हल्ला करणाऱ्या राजाला पळता

भुई थोडी झाली असती; पण त्यांना राजाकडून जेवढे उपटायचे होते ते त्यांनी आधीच उपटले होते. आता सुखाचा जीव ते दुःखात का घालणार ?

सर्वांत धाकटचा जावयाला मात्र राहवेना. " मी अमुक राजाच्या वतीने अमुक राजपुत्र तुमच्या मदतीला येत आहे. " असा राजाला त्याने निरोप पाठवला. भरपूर सैन्य घेऊन राजपुत्राच्या रुबाबात तो निघाला. ' हाच तो व्यापारी जावई ' असा त्यानें राजाला जराही संशय येऊ दिला नाही.

जोरात लढाई झाली. मदत आलेली पाहून राजालाही हुरूप चढला. हल्लेखोर राजा पराभव होऊन मागे फिरला. राजानें राजपुत्राचे मन:पूर्वक आभार मानले. त्याच्या वडिलांनी ही अचानक मदत पाठवल्याबद्दल तो त्याच्या वडिलांना भेटायला निघाला.

विजयाच्या उत्सवासाठी व पाहुण्या राजाच्या आतिथ्यासाठी धाकटचा जावयाच्या वडिलांनी म्हणजें राजाने मेजवानीचा बेत ठरवला. राजाने आपली सून पाकशास्त्रात किती हुशार आहे हे पुन्हा पुन्हा वर्णन करून सांगितले.

दोन्ही राजे जेवायला बसले. वाढपी वाढू लागले. एकाने वाटीत नुसताच गुळ वाढला. दुसऱ्याने साखर, तर तिसऱ्याने मधाची वाटी आणली. चौथ्याने वाडगा भरून दूध आणले. पाचव्याने जिलबी, पुरणपोळी, केशरीभात, हलवा नि पाकातली चिरोटी अशी पंचपक्वान्ने आणली. सहाव्याने चांदीचा पेला भरून वेलची केशर घातलेला सुधारस आणला. कारण अमृत तर स्वर्गाखेरीज कुठेंच मिळत नाही. मग तऱ्हतऱ्हेच्या भाज्या, आमटचा

मसालेभात, भजी असे पदार्थ वाढले गेले. पण झाडून सगळे पदार्थ मिठाऐवजी भरपूर गूळ किंवा साखर किंवा मध, दूध वगैरे घालून गोड गोड केले होते.

एवढे सर्व पदार्थ पाहून पाहुणा राजा खूश झाला. त्याने एकेक पदार्थ नि भाजी खाऊन पाहताच मात्र तोंड वेडेवाकडे केले ! व्यापारी राजपुत्राने विचारले, “ आवडले नाही का पदार्थ ? आपला चेहरा प्रसन्न वाटत नाही ?”

राजा म्हणाला, “ नाही नाही......तसं काही नाही. पण काही पदार्थात मीठ समजून चुकून साखर टाकली गेलेली वाटतेय..”

राजपुत्र जावई म्हणाला, “ आपल्यासाठी खास सर्व पदार्थ मुद्दामच गोड केलेले आहेत. आपल्याला मीठ अजिबात आवडत नाही असं समजलं होतं......आमच्या पदार्थात मीठ वगैरे सर्व व्यवस्थित आहे......अहो, मीठ हे तर गरिबांच अन्न. नि रावापासून रंकापर्यंत मिठाशिवाय कोणाचंच चालत नाही असं आम्ही मानतो......”

राजा आवेशात म्हणाला, “ मीही तसंच मानतो अगदी. मला मीठ आवडत नाही ही कोणीतरी आपल्याला चुकीची माहिती दिली असावी......” राजपुत्राने हुकुम देताच वाढप्यांनी भराभर राजापुढचे सर्व गोड पदार्थ उचलले. त्या ऐवजी चमचमीत खमंग असे पदार्थ आणून ठेवले. राजा प्रत्येक पदार्थाची वाखाणणी करीत मनापासून जेवू लागला.

राजपुत्राचे वडील म्हणाले, “ महाराज, हे नवलच ! मिठा-शिवाय आपलं जेवण आपल्याला इतकं बेचव वाटतं ? बदाम, पिस्ते, सोन[illegible]हतऱ्हेचा भारी मसाला

BVBK-0400232